महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : २७३ वे | दिनांक : २९/०९/२०२६ | वार : मंगळवार

# शेतकऱ्यांना हेक्टरी १ लाख मदत द्या; आमदार-खासदारांचे पगार थांबवा



**बुलढाणा** : दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना हेक्टरी १ लाख रुपये नुकसानभरपाई द्या, नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना २ लाख रुपयांचे प्रोत्साहन अनुदान द्या, सरसकट कर्जमाफी करा, अशा मागण्यांसाठी बुलढाण्यात क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या वतीने राज्यव्यापी हल्लाबोल आंदोलन करण्यात आले. बुलढाणा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर झालेल्या या आंदोलनात डफडे वाजवत, सरकारविरोधी घोषणा देत आंदोलकांनी जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात जोरदार हल्लाबोल केला. करपलेल्या सोयाबीनच्या पेंढ्या जिल्हाधिकारी कार्यालयाच्या गेटवर उधळून शेतकऱ्यांच्या नुकसानीचा संताप व्यक्त करण्यात आला. "आमदार-खासदार, सचिव कलेक्टरांचे पगार थांबवा,आणि ते पैसे शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे जमा करा. अन्यथा मंत्र्यांना रस्त्यावर फिरू देणार नाही," अशी आक्रमक भूमिका क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे संस्थापक रविकांत तुपकर यांनी मांडली.रविकांत तुपकर यांच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर बुलढाणा जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. मात्र, आंदोलकांनी डफडे वाजवत आणि सरकारविरोधी घोषणा देत संपूर्ण परिसर दणाणून सोडला. शेतकऱ्यांच्या हातात हेक्टरी १ लाख रुपये नुकसानभरपाई द्या, नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना २ लाख रुपये प्रोत्साहन अनुदान द्या, सरसकट कर्जमाफी करा, अशा मागण्यांचे फलक होते. करपलेल्या सोयाबीनच्या पेंढ्या जिल्हाधिकारी कार्यालयाच्या गेटवर उधळून शेतकऱ्यांच्या नुकसानीकडे सरकारचे लक्ष वेधण्यात आले.राज्य सरकारने जाहीर केलेल्या दुष्काळी जीआरवर रविकांत तुपकर यांनी तीव्र संताप व्यक्त केला. "सरकारची आश्वासने तकलादू आहेत. शेतकऱ्यांना दिलासा देण्याऐवजी असे जीआर काढू नका," अशी टीका त्यांनी केली. यावेळी शासनाच्या दुष्काळी जीआरच्या प्रती फाडून निषेध नोंदवण्यात आला. सोयाबीन उत्पादनासाठी हेक्टरी एक लाख रुपयांपर्यंत खर्च झाला असून, शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख रुपये नुकसानभरपाई मिळालीच पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली.शेतकऱ्यांचे नुकसान स्पष्टपणे दिसत असताना पंचनाम्यांच्या नावाखाली वेळकाढूपणा करू नये, अशी भूमिका आंदोलनातून मांडण्यात आली. शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी द्यावी, नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना २ लाख रुपयांचे प्रोत्साहन अनुदान द्यावे आणि नव्याने पीककर्ज उपलब्ध करून द्यावे, अशा मागण्या करण्यात आल्या.

# कीर्तनासाठी आले अन् सुपारीवरून भिडले



**धाराशिव** : कीर्तनाच्या कार्यक्रमाची सुपारी घेण्याच्या कारणावरून दोन कीर्तनकारांमध्ये सुरू असलेल्या जुन्या वादाला धाराशिवमध्ये उग्र स्वरूप आले. कीर्तनकार पांडुरंग धंगेकर आणि कीर्तनकार राहुल येलकर यांच्यात आधी शाब्दिक वाद झाला. त्यानंतर हा वाद थेट हाणामारीपर्यंत पोहोचला. या घटनेनंतर प्रकरण आणखी चिघळले आणि एका कीर्तनकाराने लहान वारकऱ्यांना सोबत घेऊन राष्ट्रीय महामार्गावर आंदोलन केल्याने काही काळ वाहतुकीचा खोळंबा झाला. मिळालेल्या माहितीनुसार, पांडुरंग धंगेकर आणि राहुल येलकर यांच्यात कीर्तनाच्या कार्यक्रमांची सुपारी घेण्यावरून यापूर्वीपासूनच वाद सुरू होता. 'माझी सुपारी तू का घेतोस?' या मुद्द्यावरून दोघांमध्ये मतभेद असल्याचे सांगितले जात आहे. याच कारणातून दोन्ही कीर्तनकार पुन्हा आमनेसामने आले. सुरुवातीला दोघांमध्ये जोरदार शाब्दिक बाचाबाची झाली. वाद वाढत गेल्यानंतर परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेली आणि दोन्ही बाजूंमध्ये हाणामारी झाल्याचे सांगण्यात येत आहे. घटनेमुळे परिसरात काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. हाणामारीच्या घटनेनंतर प्रकरण पोलिसांपर्यंत पोहोचले. मात्र, त्यानंतर एका कीर्तनकाराने बाल वारकऱ्यांना सोबत घेत राष्ट्रीय महामार्गावर आंदोलन सुरू केले. हे आंदोलन सुमारे दोन तास सुरू राहिल्याने महामार्गावरील वाहतुकीवर परिणाम झाला. भर उन्हात लहान वारकऱ्यांना आंदोलनासाठी रस्त्यावर बसवण्यात आल्याने त्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्नही निर्माण झाला. याच आंदोलनादरम्यान एका बाल वारकऱ्याला भोवळ आल्याने त्याला उपचारासाठी हलवावे लागल्याची माहिती आहे. राष्ट्रीय महामार्गावर आंदोलन झाल्यामुळे वाहनांच्या रांगा लागल्या आणि वाहतूक विस्कळीत झाली. त्यामुळे महामार्गावरून प्रवास करणाऱ्या नागरिकांना काही काळ अडचणींचा सामना करावा लागला. आंदोलनासाठी बाल वारकऱ्यांचा वापर केल्याच्या प्रकारावरूनही प्रतिक्रिया उमटत आहेत. दरम्यान, पोलिसांकडून तक्रार घेऊन गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया करण्याची तयारी असल्याचे सांगितले जात असतानाही आंदोलन सुरू ठेवण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे. त्यामुळे हाणामारीनंतरचा वाद अधिकच चिघळल्याचे चित्र पाहायला मिळाले.

# MPSC च्या 3 महत्त्वाच्या परीक्षा पुढे ढकलल्या:राज्यसेवा मुख्य परीक्षेची 3 ऑक्टोबरची परीक्षा स्थगित, नवीन तारखा लवकरच

**मुंबई** : महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने (MPSC) ऑक्टोबरमध्ये नियोजित असलेल्या तीन महत्त्वाच्या मुख्य परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये राज्यसेवा मुख्य परीक्षा २०२६, महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) मुख्य परीक्षा २०२६ आणि महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा २०२६ यांचा समावेश आहे. राज्यसेवा मुख्य परीक्षा ३ ऑक्टोबर २०२६ पासून सुरू होणार होती. आयोगाच्या निर्णयामुळे या परीक्षांची तयारी करणाऱ्या उमेदवारांना मोठा दिलासा मिळाला असला, तरी सुधारित वेळापत्रकाची प्रतीक्षा करावी लागणार आहे. राज्यसेवा मुख्य परीक्षा २०२६ ही ३ ऑक्टोबरपासून सुरू होणार होती. मात्र, राज्यसेवा मुख्य परीक्षा २०२५ च्या उत्तरपत्रिकांच्या मूल्यांकनाबाबत विद्यार्थी आणि विद्यार्थी संघटनांकडून आक्षेप नोंदवण्यात आले होते. या आक्षेपांचा विचार करून आयोगाने २०२५ च्या परीक्षेतील उत्तरपत्रिकांचे पुनर्मूल्यांकन करण्याचा निर्णय घेतला आहे. पुनर्मूल्यांकनाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच पुढील निकाल आणि संबंधित प्रक्रियेवर परिणाम होणार असल्याने परीक्षांच्या नियोजनावरही त्याचा परिणाम झाला आहे. राज्यातील विविध स्पर्धा परीक्षांच्या पद्धतींचा आढावा घेण्यासाठी राज्य सरकारने उच्चस्तरीय समिती स्थापन केली आहे. या समितीने परीक्षार्थी तसेच संबंधित घटकांशी चर्चा करून विविध परीक्षा पद्धतींचा अभ्यास केला आहे. आदर्श परीक्षा पद्धतीबाबत समितीच्या शिफारशी अपेक्षित आहेत. दरम्यान, परीक्षा पुढे ढकलण्याची मागणी करणारी निवेदने विद्यार्थी, पालक, विद्यार्थी संघटना तसेच काही लोकप्रतिनिधींनी आयोगाकडे सादर केली होती. या सर्व बाबींचा विचार करून आयोगाने तीनही मुख्य परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला आहे. MPSCच्या निर्णयानुसार पुढील परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या आहेत— महाराष्ट्र राज्यसेवा मुख्य परीक्षा २०२६ महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) मुख्य परीक्षा २०२६ महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा २०२६ या निर्णयामुळे या तिन्ही परीक्षांना बसणाऱ्या उमेदवारांच्या परीक्षा नियोजनात बदल होणार आहे. सध्या या तिन्ही परीक्षांच्या सुधारित तारखा आयोगाने जाहीर केलेल्या नाहीत. MPSCकडून सुधारित वेळापत्रक स्वतंत्रपणे प्रसिद्ध करण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे उमेदवारांनी सोशल मीडिया किंवा अनधिकृत संदेशांवर अवलंबून न राहता आयोगाच्या अधिकृत सूचना तपासणे आवश्यक आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २९ सप्टेंबर २०२६


## "भूतकाळाचे वर्तमानाशी नाते" उलगडणाऱ्या विद्यार्थिनींच्या पोस्टर सादरीकरणाला उत्स्फूर्त प्रतिसाद



**छत्रपती संभाजीनगर** : डॉ. रफीक झकेरिया कॉलेज फॉर वुमेनमध्ये इतिहास विभागातर्फे स्पर्धेचे आयोजन छत्रपती संभाजीनगर, 28 सप्टेंबर : डॉ. रफीक झकेरिया कॉलेज फॉर वुमेन येथे इतिहास विभागाच्या वतीने 'भूतकाळाचे वर्तमानाशी नाते' या विषयावर पोस्टर सादरीकरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थिनींनी विविध ऐतिहासिक घटना, व्यक्तिमत्त्वे, सामाजिक परिवर्तन आणि सांस्कृतिक वारसा यांचा वर्तमानाशी असलेला संबंध अभ्यासपूर्ण, सर्जनशील आणि आकर्षक पद्धतीने पोस्टर्सच्या माध्यमातून मांडला.स्पर्धेचे उद्घाटन महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या प्रो. विद्या प्रधान यांच्या हस्ते झाले. विद्यार्थिनींनी विषयाचा अभ्यास करून इतिहासातील विविध घटनांचा वर्तमानाशी असलेला संबंध प्रभावीपणे स्पष्ट केला. त्यांच्या संशोधनवृत्ती, कल्पकता, विषयाची मांडणी आणि प्रभावी सादरीकरणाचे विशेष कौतुक करण्यात आले.स्पर्धेचे परीक्षक म्हणून मॉडेल डी.एड. कॉलेजच्या प्रा. शेख महजबीन यांनी जबाबदारी पार पाडली. त्यांनी पोस्टर्समधील आशय, ऐतिहासिक संदर्भ, सर्जनशीलता, मांडणी आणि सादरीकरणाचे परीक्षण केले.यावेळी महाविद्यालयाचे IQAC समन्वयक डॉ. तन्मय पैठणकर, इतिहास विभागाच्या डॉ. लुबना शिरीन, प्रा.इरफान शेख, अर्शिया नाझनीन तसेच विविध विभागांतील प्राध्यापक उपस्थित होते. मोठ्या संख्येने विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपल्या पोस्टर्सचे प्रभावी सादरीकरण केले.या उपक्रमामुळे विद्यार्थिनींना इतिहासाचा वर्तमानाशी असलेला संबंध समजून घेण्याबरोबरच ऐतिहासिक व सांस्कृतिक वारशाबद्दल जागरूक होण्याची संधी मिळाली.

# मिल्लिया महाविद्यालयाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे उद्घाटन संपन्न



**बीड** : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर अंतर्गत आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे मिल्लिया कला, विज्ञान व व्यवस्थापनशास्त्र महाविद्यालयात दिनांक २८ सप्टेंबर २०२६ सोमवार रोजी आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. अश्विन रांजणीकर (डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर) यांच्या हस्ते ऑनलाइन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहम्मद इलयास फाजील, उपप्राचार्य प्रोफेसर एसएस.हुसैनी, आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे कार्यक्रमाधिकारी प्रोफेसर ए.एम.पठाण, विद्यार्थी-विद्यार्थीनी, प्राध्यापक वृंद यांची उपस्थिती होती. संचालक डॉ. अश्विन रांजणीकर यांनी सांगितले की विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास, समाजाशी महाविद्यालयाचे नाते दृढ करणे आणि विस्तार कार्य अधिक प्रभावीपणे राबविणे हा मुख्य उद्देश आहे. महाविद्यालयाने एक गाव दत्तक घेऊन त्या गावाचा सर्वांगीण सर्वेक्षण करावा. गावातील गरजा व समस्या जाणून घेऊन त्यानुसार विविध उपक्रम राबवावेत, तसेच विद्यार्थ्यांच्या कौशल्यविकासासाठी विविध सर्टिफिकेट कोर्सेस सुरू करावेत, विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासह त्यांच्या शैक्षणिक, कौशल्यात्मक व सामाजिक विकासासाठी विविध उपक्रम राबवावेत, असे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहम्मद इलयास फाजील यांनी सांगितले की स्टार्टअपच्या माध्यमातून युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करावेत, युवकांना कौशल्याधारित प्रशिक्षण व योग्य मार्गदर्शन द्यावे, तसेच समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल व्यक्तींना स्वावलंबी बनविण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन व सहकार्य करावे. शिक्षण, सामाजिक सेवा, कौशल्यविकास, रोजगारनिर्मिती आणि समाजातील वंचित घटकांच्या उन्नतीसाठी महाविद्यालय विविध उपक्रम हाती घेतले आहेत.कार्यक्रमाची सुरुवात अरेबिक विभाग प्रमुख प्रोफेसर अब्दुल समद यांनी पवित्र कुराण पठण करून केली, सूत्रसंचालन इंग्रजी विभाग प्रमुख प्रोफेसर अब्दुल अनीस यांनी तर आभारप्रदर्शन आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे कार्यक्रमाधिकारी प्रोफेसर ए.एम.पठाण यांनी व्यक्त केले.






# दुष्काळाच्या झळांनी शेतकरी होरपळला; आदित्य ठाकरेंकडे मदतीची हाक



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले)** : उमरगा—लोहारा तालुक्यातील पिकांच्या नुकसानीची मांडली व्यथा; जगदीश सुरवसे यांचे निवेदन अचलेरसह उमरगा—लोहारा तालुक्यात पावसाने ओढ दिल्याने खरीप पिकांची अवस्था अत्यंत बिकट झाली असून, शेतकऱ्यांसमोर आर्थिक संकट उभे ठाकले आहे. सोयाबीन, तूर, मूग, उडीद, कापूस आदी पिके पाण्याअभावी कोमेजून गेली आहेत. शेतकऱ्यांनी पिकांसाठी केलेला खर्च वाया जाण्याची परिस्थिती निर्माण झाल्याने शासनाने तातडीने भरीव मदत जाहीर करावी, अशी मागणी अचलेर येथील रहिवासी तथा महाराष्ट्र पत्रकार संघटनेचे लोहारा तालुका उपाध्यक्ष जगदीश सुरवसे यांनी माजी मंत्री तथा आमदार आदित्य उद्धवसाहेब ठाकरे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली.लोहारा तालुक्यातील दुष्काळी परिस्थितीची पाहणी करण्यासाठी आदित्य ठाकरे आष्टा—मोड—लोहारा परिसरात आले असता सुरवसे यांनी त्यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. यावेळी विधान परिषदेचे माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, शिवसेना नेत्या सुषमाताई अंधारे, आमदार कैलासदादा पाटील, आमदार प्रविण स्वामी यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते. यावेळी सुरवसे यांनी पावसाअभावी कोमेजलेल्या पिकांची अवस्था, वाढता उत्पादन खर्च आणि अपेक्षित उत्पन्नावर आलेले संकट याबाबत माहिती दिली. बियाणे, खते, औषधे, मशागत व मजुरीवर मोठा खर्च करूनही पिकांच्या वाढीच्या महत्त्वाच्या टप्प्यावर पावसाने दडी मारल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडले आहे.तातडीच्या मदतीसह कायमस्वरूपी उपाययोजनांची मागणीदुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने नुकसानभरपाई द्यावी, पीकविम्याचा लाभ मिळवून द्यावा तसेच शासनाच्या दुष्काळी मदतीचा लाभ पात्र शेतकऱ्यांना तत्काळ मिळावा, अशी मागणी करण्यात आली.तसेच पाणी, रोजगार, चारा, पीकविमा, नुकसानभरपाई आणि कर्जसवलतीचे सर्वसमावेशक पॅकेज जाहीर करावे. प्रत्येक गावासाठी दीर्घकालीन जलसंधारण आराखडा तयार करून 'पाणी अडवा—पाणी जिरवा'च्या माध्यमातून जलसाठे निर्माण करावेत. गावागावांत जलसंधारणाची कामे हाती घेऊन भविष्यातील दुष्काळाचा सामना करण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात. बेरोजगार युवकांच्या हाताला रोजगार उपलब्ध करून द्यावा, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली.उमरगा—लोहारा तालुक्यातील शेतकऱ्यांच्या या गंभीर प्रश्नावर शासनस्तरावर तातडीने पाठपुरावा करून आवश्यक मदत मिळवून द्यावी, अशी अपेक्षा जगदीश सुरवसे यांनी व्यक्त केली.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २९ सप्टेंबर २०२६


# अन्न सुरक्षा मानके कायदा २००६ अंतर्गत जिल्हास्तरीय समितीची बैठक संपन्न




**बीड (भगवंत पाळवदे) :** अन्न सुरक्षा हा केवळ कायद्याचा विषय नसून तो थेट मानवी आरोग्याशी जोडलेला आहे. त्यामुळे जिल्ह्यात अन्न सुरक्षा कायद्याची कडक अंमलबजावणी करा. कोणत्याही दबावाखाली न येता अन्न सुरक्षा मानकांचे उल्लंघन करणाऱ्यावर कडक कारवाई करा. नागरिकांच्या जिवाशी खेळणाऱ्यांची अजिबात गय केली जाणार नाही, असे निर्देश जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी दिले आहेत.जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात अन्न सुरक्षा मानके कायदा २००६ अंतर्गत जिल्हास्तरीय समितीची बैठक संपन्न झाली. या बैठकीस अन्न व औषध प्रशासनाचे सहायक आयुक्त नितिन मोहिते यांच्यासह संबंधित यंत्रणेचे अधिकारी उपस्थित होते.अन्न व औषध प्रशासनातील कार्यरत अधिकाऱ्यांच्या प्रत्यक्ष भेटी आणि तपासणीबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी अत्यंत कडक भूमिका घेतली असून प्रत्यक्षात ऑन फिल्ड काम करण्याच्या सूचनाही जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी दिल्या. जिल्ह्यातील हॉटेल्स, दुग्धशाळा आणि मिठाईच्या दुकानांची नियमित व अचानक तपासणी करण्याचे आदेश त्यांनी दिले आहेत. तसेच या तपासणी कामात कुठेही हलगर्जीपणा आढळल्यास संबंधित अधिकाऱ्यावरच कठोर कारवाई केली जाईल, असा इशाराही जिल्हाधिकारी श्री. जॉन्सन यांनी दिला. विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी कोणतीही तडजोड खपवून घेतली जाणार नाही, असे सांगत जिल्हाधिकारी श्री.जॉन्सन यांनी अंगणवाडी तसेच शाळामध्ये दिल्या जाणाऱ्या शालेय पोषण आहाराची गुणवत्ता तपासण्याचे विशेष आदेश दिले. ग्रामीण व शहरी भागातील नागरिकांना सुरक्षित आणि सकस आहार मिळावा, यासाठी नागरिकांमध्ये सुरक्षित अन्नाबाबत मोठ्या प्रमाणावर जागरूकता निर्माण करावी, असेही त्यांनी सांगितले.जिल्ह्यात परवानाधारक आस्थापना २५४६ असून नोंदणीधारक आस्थापना १८१३४ अशा एकुण आस्थापना २० हजार ६८० आहेत. १ एप्रिल २०२६ ते आजपर्यंत एकुण १९३ अन्न नमुने घेतले असून १०० अहवाल प्रलंबित आहेत. तसेच एकुण २४६ तपासण्या करण्यात आल्या असून ९ परवाने निलंबित करण्यात आले आहेत. अशी माहिती अन्न व औषध प्रशासनाचे सहायक आयुक्त नितिन मोहिते यांनी दिली

# आदिवासी क्रांतिकारक राया ठाकर फाउंडेशनची पहिली राज्यस्तरीय बैठक उत्साहात संपन्न



**खुलताबाद (सनिराम गावंडे) :** संघटनात्मक विस्ताराचा निर्धार; विविध पदांवर नव्या पदाधिकाऱ्यांची नियुक्त्या आदिवासी क्रांतिकारक राया ठाकर फाउंडेशन महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतरची पहिली राज्यस्तरीय कार्यकारिणी बैठक आज दि. 27 सप्टेंबर 2026 रोजी संस्थापक अध्यक्ष श्री. पांडुरंग काशिनाथ पारधी यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली.बैठकीत फाउंडेशनच्या आगामी कार्याची दिशा, राज्य व जिल्हास्तरीय संघटनात्मक बांधणी, तालुका व गावपातळीवर विस्तार, आदिवासी समाजाच्या विविध प्रश्नांवर काम तसेच युवक व समाजातील विविध घटकांना संघटनेशी जोडण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.यावेळी संघटनेच्या कार्याला अधिक व्यापक स्वरूप देण्यासाठी नव्याने विविध पदांवर पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली. नियुक्त झालेल्या सर्व पदाधिकाऱ्यांनी फाउंडेशनच्या माध्यमातून आदिवासी समाजाच्या हितासाठी प्रामाणिकपणे आणि एकजुटीने काम करण्याचा निर्धार व्यक्त केला. नव्याने नियुक्त करण्यात आलेले पदाधिकारीश्री. तुळशीराम कातोरे – कार्याध्यक्षश्री. लहू उघडे – राज्य संघटकश्री. सखाराम ठकाबाबा गांगड – राज्य कलापथक अध्यक्षश्री. सनिराम गावंडे – छत्रपती संभाजीनगर विभागीय अध्यक्षश्री. कृष्णा गोहिरे – राज्य युवा अध्यक्षश्री. श्रावण बरतड – ठाणे जिल्हा उपाध्यक्षश्री. मंगळू सावंत (पिंटू) – इगतपुरी तालुका कार्याध्यक्षश्री रमेश उघडा- मुरबाड तालुका सहसचिवदिलीप वाघ- मुरबाड तालुका कार्याध्यक्ष कृष्णा गोहिरे यांची राज्य युवा अध्यक्षपदी नियुक्तीबैठकीतील विशेष निर्णय म्हणून श्री. कृष्णा गोहिरे यांची आदिवासी क्रांतिकारक राया ठाकर फाउंडेशन महाराष्ट्र राज्य युवा अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली.यावेळी श्री. कृष्णा गोहिरे यांनी यापूर्वी "राया ठाकर समाजसेवा संघटना" या नावाने सुरू असलेल्या सामाजिक कार्याबाबत उपस्थित पदाधिकाऱ्यांसमोर आपली भूमिका स्पष्ट केली. यापुढे फाउंडेशनच्या माध्यमातून एकत्रितपणे समाजासाठी काम करण्याची ग्वाही त्यांनी सर्वांसमोर दिली. त्यांच्या या निर्णयाचे उपस्थित पदाधिकाऱ्यांनी स्वागत केले.त्यानंतर संस्थापक अध्यक्ष व उपस्थित सर्व पदाधिकाऱ्यांच्या साक्षीने त्यांना *आदिवासी क्रांतिकारक राया ठाकर फाउंडेशन महाराष्ट्र राज्य युवा अध्यक्ष* या पदावर नियुक्त करण्यात आले.बैठकीस उपस्थित पदाधिकारीबैठकीस संस्थापक अध्यक्ष श्री. पांडुरंग काशिनाथ पारधी, राज्य उपाध्यक्ष श्री. सिताराम कमळू गावंडा, राज्य सचिव श्री. राजू काळू गांगड, राज्य खजिनदार श्री. भगवंत सखाराम शिद, राज्य सदस्य श्री. गोविंद राघो भला, राज्य सदस्य श्री. सुनील गुलाब पारवे, राज्य सल्लागार श्री. देविदास हिंदोळे, ठाणे जिल्हा अध्यक्ष श्री. अनिल कवटे इगतपुरी अध्यक्ष श्री. गोविंद सावंत, अकोले अध्यक्ष श्री. अक्षय उघडे मुरबाड अध्यक्ष छत्रपती संभाजीनगर खुलताबाद अध्यक्ष श्री. सनिराम गावंडे आदी पदाधिकारी उपस्थित होते.बैठकीत फाउंडेशनच्या माध्यमातून *आदिवासी समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक व मूलभूत प्रश्नांसाठी संघटितपणे काम करण्याचा निर्धार* करण्यात आला. तसेच आगामी काळात राज्यातील विविध जिल्हे, तालुके आणि गावपातळीवर संघटनेची बांधणी अधिक मजबूत करण्यावर भर देण्याचे निश्चित करण्यात आले.नवनियुक्त सर्व पदाधिकाऱ्यांचे उपस्थित मान्यवरांनी अभिनंदन करून पुढील सामाजिक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या."एकजूट, संघटन आणि समाजहित" या भूमिकेतून आदिवासी समाजाच्या प्रश्नांसाठी संघटितपणे काम करण्याचा निर्धार करत आजची पहिली राज्यस्तरीय बैठक सुरळीतपणे पार पडली.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २९ सप्टेंबर २०२६


## ज्योती मुळे, बबन गव्हाणे यांना 'महाराष्ट्र रत्न २०२६' पुरस्कार



**दौलताबाद (जावेद अहमद) :** नालंदा ऑर्गनायझेशन तर्फ पुणे येथे 'महाराष्ट्ररत्न आद्गुणगौरव सन्मान सोहळा' उत्साहात संपन्न; विविध क्षेत्रातील ५० हून अधिक गुणवंतांचा गौरव करण्यात आलेज्योती नंदकिशोर मुळेआदर्श सरपंच व बबन भाऊसाहेब गव्हाणे आदर्श ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत माळीवाडा ता.जी.छत्रपती संभाजीनगर यांना महाराष्ट्र रत्न-२०२६ या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.राज्यातील विविध क्षेत्रातील गौरव करण्यासाठी आयोजित केलेला राज्यस्तरीय 'महाराष्ट्ररत्न गुणगौरव सन्मान सोहळा २०२६' रविवारी, २७ सप्टेंबर रोजी पुणे येथे पार पडलेया सोहळ्यात सामाजिक, राजकीय, ग्रामीण विकास,आरोग्य, कला, शिक्षण, उद्योग आणि कृषी अशा विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून चित्रपट असोसिएशनचे अध्यक्षनितीन दवणे, जितेंद्र तुळशीराम दाते ,वृक्ष अभ्यासक वंदना जाधव उपस्थित होत्या. माळीवाडा येथील या दोन्ही प्रमुख पदाधिकाऱ्यांना राज्यस्तरीय पुरस्कार मिळाल्याबद्दल माळीवाडा, दौलताबाद येथील पदाधिकारी व ग्रामस्थांनी अभिनंदन केले आहे.

## प्राचार्य केशव भांगे यांचा मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते सन्मान



**(शिरूर कासार) :** कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा प्राचार्य केशव भांगे साहेब यांना महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ,मुंबई यांचा 'उत्कृष्ट प्राचार्य' राज्यस्तरीय पुरस्कार-२०२६' चा हा राज्य पुरस्कार महाराष्ट्र राज्याच्या पशुसंवर्धन, पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री मा.ना.पंकजाताई गोपीनाथरावजी मुंडे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शिक्षक, संस्थाचालक व शिक्षक संघटना यांचा भव्य दिव्य पुरस्कार वितरण सोहळा,बीड येथील स्व.यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात पार पडला.महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ,मुंबई शाखा बीड यांच्या वतीने दरवर्षी गुणवान व कर्तुत्वान शिक्षकांना 'शिक्षक सन्मान पुरस्कार' देवून सन्मानित करण्यात येते. यावर्षी एकूण ३० शिक्षकांना मान्यवरांच्या शुभ हस्ते पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.यांमध्ये शिरूर (का.) येथील कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य केशव भांगे साहेब यांच्या शैक्षणिक कार्याची दखल घेऊन पत्रकार संघाचा हा अतिशय प्रतिष्ठेचा असलेला 'उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार' मिळाल्याबद्दल. आदर्श शिक्षण संस्थेच्या व कालिकादेवी विद्यालयाच्या यशात मानाचा तुरा रोला गेला आहे.या पुरस्काराबद्दल माजी मंत्री तथा आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव मा.जयदत्त (अण्णा) क्षीरसागर साहेब,मा.रोहित (दादा) क्षीरसागर साहेब,संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ.राजूजी मचाले साहेब, सहाय्यक प्रशासन अधिकारी मा. योगेश पवार साहेब,कार्यवाहक मा.एम.ए.राऊत, आदर्श शिक्षण संस्थेतील सर्व मुख्याध्यापक, प्राचार्य, वरिष्ठ प्राध्यापक, कनिष्ठ प्राध्यापक, शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी, स्नेही, नातेवाईक, व कुटुंबातील सर्वांनीच प्राचार्य केशव भांगे यांचे अभिनंदन केले आहे.

## सेवा संकल्प अभियानांतर्गत चापानेर येथे विविध स्पर्धा संपन्न



**कन्नड (अरुण थोरात) :** भाजप संभाजीनगर जिल्हाप्रभारी तथा मा.खा. डॉ. प्रितमताई मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत दि.२८ सप्टेंबर रोजी सेवा संकल्प अभियानांतर्गत चापानेर ता.कन्नड भव्य वक्तृत्व, रांगोळी व चित्रकला स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित 'सेवा संकल्प अभियान' अंतर्गत कन्नड तालुक्यातील चापानेर येथे भव्य वक्तृत्व, रांगोळी व चित्रकला स्पर्धेचे उत्साहपूर्ण वातावरणात आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास जिल्हा प्रभारी मा. खा. डॉ. प्रीतमताई मुंडे व भाजपा जिल्हाध्यक्ष संजय खंबायते यांची प्रमुख उपस्थिती लाभली.स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी आपल्या वक्तृत्वातून विचारांची, तर रांगोळी व चित्रकलेतून आपल्या सर्जनशीलतेची सुंदर अभिव्यक्ती केली. सहभागी स्पर्धकांचा उत्साह आणि उपस्थितांचा उत्स्फूर्त प्रतिसाद कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले.यावेळी जि. प. सदस्य डॉ. संजय गव्हाणे, मा.जि.प.सदस्य किशोर आबा पवार, जिल्हा सरचिटणीस सुभाष काळे, प्रकाश आण्णा घुले, जि. प. महिला व बालकल्याण सभापती मीनाक्षीताई पवार, मंडळ अध्यक्ष ललित सुरासे, जि. प. सदस्या डॉ. तृप्तीताई राजूपत, जि.प.सदस्य मंजुषाताई मलदोडे, पंचायत समिती उपसभापती मायाताई सुरासे, संतोष करवंदे, संघर्ष बोलधने, जि.प.सदस्य डॉ. दिलीप सिंग राजपूत, जिल्हा सचिव बबन बनसोड, प्रशांत अग्रवाल, सौरभ कुलकर्णी, प्रकाश नागरे, कैलास जाधव तसेच महिला मोर्चा सरचिटणीस अर्चनाताई पवार, सुनीताताई निंभोरे यांच्यासह सर्व जिल्हा व मंडळ पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

## अभिनव विद्या विहार प्राथमिक शाळेत स्वयंशासन दिन उत्साहात



**पूर्णा :** कौशल्यानगर येथील अभिनव विद्या विहार प्राथमिक शाळेत स्वयंशासन दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी शिक्षक-शिक्षिकांची भूमिका समर्थपणे पार पाडत विविध विषयांच्या तासिका घेतल्या.शिक्षकांच्या वेशभूषेत शाळेत दाखल झालेल्या विद्यार्थ्यांनी अध्यापनाची जबाबदारी आत्मविश्वासाने सांभाळली. शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी प्रभावीपणे अध्यापन करत नेतृत्वगुण, वक्तृत्वकौशल्य, शिस्त, जबाबदारीची जाणीव आणि निर्णयक्षमता यांचे दर्शन घडविले. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे शाळेतील वातावरण आनंदमय झाले होते.या कार्यक्रमास शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष आनंदजी आजमेरा आणि दिलीप माने सर यांची उपस्थिती लाभली. स्वयंशासन दिनानिमित्त विद्यार्थ्यांसाठी शाळेच्या परसबागेतील ताज्या पालकापासून तयार केलेली पालक वरण-भात असा पौष्टिक भोजनाचा उपक्रम राबविण्यात आला. विद्यार्थ्यांनी या भोजनाचा आनंदाने आस्वाद घेतला.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मुख्याध्यापिका निर्मला रेड्डी, शिक्षक विठ्ठल अनमुलवाड, विश्वनाथ नागठाणे, मल्लिकार्जुन भालेराव, प्रल्हाद स्वामी, गोविंद इंगोले, उद्धव घाटोळ, संदीप बुलबुले, बालिका यमगर आणि विनिता काळे यांनी सहकार्य केले.विद्यार्थ्यांना शालेय व्यवस्थापनाचा प्रत्यक्ष अनुभव देऊन त्यांच्यात नेतृत्वगुण, शिस्त, जबाबदारी आणि निर्णयक्षमता विकसित करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेला स्वयंशासन दिन उत्साहात संपन्न झाला.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २९ सप्टेंबर २०२६

## जिल्ह्यात दुष्काळ: अधिकाऱ्यांना मुख्यालय सोडण्यास सक्त मनाई; पूर्व परवानगीशिवाय रजेवर गेलेल्यांवर फौजदारी कारवाईचा इशारा

**बीड (भगवंत पाळवदे)** :बीड जिल्ह्यासह संपूर्ण जिल्ह्यात सद्य:स्थितीत गंभीर दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असून, पाणीटंचाई, चाराटंचाई आणि पिकांचे अतोनात नुकसान झाल्याने शेतकरी बांधव मोठ्या संकटात सापडले आहेत. या पार्श्वभूमीवर शासनाने बीड जिल्ह्यातील सर्व 11 तालुक्यांत विविध सवलती लागू केल्या आहेत. ही गंभीर आणीबाणीची परिस्थिती लक्षात घेता, प्रशासकीय यंत्रणा सतर्क व गतिमान ठेवण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष विवेक जॉन्सन यांनी एक कठोर परिपत्रक जारी केले आहे.या आदेशानुसार महसूल, कृषी, ग्रामविकास, नगरविकास, भूमी अभिलेख, महावितरण, पशुसंवर्धन, जलसंपदा, शिक्षण, पुरवठा, सहकार व पाणीपुरवठा यांसारख्या महत्त्वाच्या विभागांच्या जिल्हा व तालुकास्तरीय अधिकाऱ्यांना मुख्यालय न सोडण्याचे कडक निर्देश देण्यात आले आहेत. * रजा मंजुरीचे सर्वाधिकार जिल्हाधिकाऱ्यांकडे: सद्य:स्थितीत दुष्काळी आणीबाणी संपेपर्यंत संबंधित सर्व अधिकाऱ्यांची कोणतीही रजा (अतितातडीची वैद्यकीय रजा वगळता) केवळ जिल्हाधिकाऱ्यांच्या पूर्वपरवानगीनेच मंजूर केली जाईल. * मुख्यालय सोडण्यास बंदी: सर्व क्षेत्रीय व तालुकास्तरीय अधिकाऱ्यांनी मुख्यालयी पूर्णवेळ हजर राहून पीक पाहणी, कर्ज पुनर्गठन आणि शेतकरी सहाय्याची कामे सर्वोच्च प्राधान्याने पार पाडावीत. * विनापरवानगी गैरहजेरीवर दुहेरी कारवाई: पूर्वपरवानगीशिवाय मुख्यालय सोडणाऱ्या किंवा रजेवर जाणाऱ्या अधिकाऱ्यांवर 'महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९' अन्वये निलंबन व विभागीय चौकशीची कारवाई केली जाईल. * फौजदारी गुन्हा दाखल होणार: दुष्काळ हा अधिसूचित आपत्ती प्रवर्गात येत असल्याने, कर्तव्यात कसूर करणाऱ्या किंवा आपत्ती निवारण कार्यात बाधा आणणाऱ्या अधिकाऱ्यांवर 'आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५' च्या कलम 51, 55 व 56 नुसार तात्काळ दंडात्मक व दखलपात्र फौजदारी गुन्हा (FIR) दाखल करण्यात येईल.प्रशासन दुष्काळग्रस्त शेतकरी व ग्रामस्थांच्या पाठीशी असून सर्व अधिकाऱ्यांनी संकटात असलेल्या शेतकऱ्यांच्या अडचणी संवेदनशीलतेने ऐकून घेत त्यांचा जागेवरच निपटारा करावा, असे निर्देश जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आले आहेत.

## जिल्ह्यात राष्ट्रव्यापी 'सुधारणा उत्सव' अभियानाची प्रभावी अंमलबजावणी; नागरिकांना प्रशासकीय सुधारणांसाठी सूचना नोंदविण्याचे आवाहन

**बीड (भगवंत पाळवदे)** : शासनाच्या प्रशासकीय यंत्रणेमध्ये नागरिकांचा सहभाग वाढवून विद्यमान शासकीय प्रक्रिया, नियम, कार्यपद्धती व सेवा वितरण प्रणाली यामध्ये आवश्यक त्या पद्धतशीर व संरचनात्मक सुधारणा घडवून आणण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र राज्यात 'सुधारणा उत्सव' (Reform Utsav) या राष्ट्रव्यापी अभियानाची अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे. हा उपक्रम नागरिकांच्या सहभागातून प्रशासकीय सुधारणांबाबतच्या सूचना प्राप्त करून त्यांचे परीक्षण, वर्गीकरण व अंमलबजावणी करण्यासाठीचा एक कालबद्ध उपक्रम आहे. या अभियानाचा मुख्य केंद्रबिंदू नागरिकांच्या सूचनांचे प्रत्यक्ष, कार्यक्षम व परिणामकारक सुधारणांमध्ये रूपांतर करणे हा आहे. या अभियानामध्ये जन मंथन (Discover), विमर्श (Deliberate) आणि जन समाधान (Deliver) या तीन प्रमुख टप्प्यांद्वारे नागरिकांच्या सूचनांचे संकलन, विभागीय स्तरावर परीक्षण व सुधारणा सूचनांची अंमलबजावणी करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.या अभियानाची व्याप्ती राज्य शासनाच्या सर्व प्रशासकीय विभागांशी संबंधित नियम, प्रक्रिया, कार्यपद्धती, सेवा वितरण व्यवस्था, अर्ज व नोंदणी प्रक्रिया, प्रमाणपत्रे, परवाने व मान्यता, मंजुरी व ना-हरकत प्रमाणपत्रे, नागरिक व व्यवसायांसाठीचे अनुपालन, दस्तऐवजांची आवश्यकता, विभागीय व आंतरविभागीय कार्यपद्धती, डिजिटल सेवा, माहिती तंत्रज्ञान प्रणाली, विदा (डेटा) देवाणघेवाण, संस्थात्मक रचना, निर्णय प्रक्रिया, निरीक्षण व अहवाल प्रणाली तसेच शासकीय योजनांच्या अंमलबजावणीतील संरचनात्मक अडथळे या बाबींशी संबंधित राहणार आहे.बीड जिल्ह्यात दिनांक 2 ऑक्टोबर ते 31 ऑक्टोबर 2026 या कालावधीत जिल्हाभर जन-मंथन अभियान राबविण्यात येणार आहे. यादरम्यान प्रत्येक ग्रामपंचायत स्तरावर किमान एक जन-मंथन सभा आयोजित करण्यात येणार असून, आवश्यकता भासल्यास नागरी भागातही तत्सम कार्यक्रमांचे आयोजन केले जाईल.शासनाने या अभियानांतर्गत सुधारणा निश्चितीसाठी सर्वसाधारणता, संरचनात्मक मूळ कारण, भविष्यलक्षी, पुनरावृत्तीक्षम/व्याप्तीक्षम आणि रचनात्मक असे पाच महत्त्वाचे निकष नमूद केले आहेत. या सुधारणांमधून वैयक्तिक तक्रारी, आक्षेपार्ह किंवा द्वेषपूर्ण मजकूर, स्थळनिश्चित पायाभूत सुविधांची मागणी, वेतन किंवा सेवाशर्तींच्या मागण्या, कर दर किंवा शुल्कातील ठराविक बदल, राजकीय किंवा अकृतिशील सूचना, आधीच अमलात किंवा प्रक्रियेत असलेल्या बाबी, न्यायप्रविष्ट बाबी तसेच व्यक्तीनिष्ठ अपवादाच्या मागण्या हे प्रवर्ग वगळण्यात आले आहेत. मात्र, एखाद्या वैयक्तिक तक्रारीतून शासनाचे नियम, प्रक्रिया किंवा व्यवस्थेतील सर्वसाधारण त्रुटी निदर्शनास आल्यास, त्यातील संरचनात्मक मुद्द्याचा स्वतंत्र सुधारणा सूचना म्हणून विचार केला जाऊ शकतो.जिल्ह्यातील सर्व नागरिकांना याद्वारे आवाहन करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या नाविन्यपूर्ण आणि रचनात्मक सुधारणा सूचना दिनांक 31 ऑक्टोबर 2026 रोजी रात्री 12:00 वाजेपर्यंत 'रिफॉर्म उत्सव' पोर्टलवर नोंदवाव्यात. या अभियानाबाबत अधिक माहितीसाठी महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक 1 सप्टेंबर 2026 रोजीच्या शासन निर्णयाचे अवलोकन करावे.

## विद्यार्थ्यांच्या मनात लोककलेची बीजे रुजावी - नीलम शिर्के सामंत



**छत्रपती संभाजीनगर** : "आतापासूनच छोट्या छोट्या मुलांच्या मनात लोककलेची बीजे रोवून लोककलेविषयी त्यांच्या मनात आदराची भावना सतत तेवत राहावी यासाठीच जल्लोष लोककलेचा या कार्यक्रमाचा उद्देश आहे",असे प्रतिपादन बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्षा नीलम शिर्के सामंत यांनी केले. बालरंगभूमी परिषद आणि एमजीएम विद्यापीठ संगीत व नाट्यशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित 'जल्लोष लोककलेचा 2026' या कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी श्रीमती शिर्के बोलत होत्या. कार्यक्रमास एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. कर्नल विलास सपकाळ तसेच कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर यांची विशेष उपस्थिती होती. पुढे बोलताना नीलम शिर्के म्हणाल्या की, 'महाराष्ट्रात विविध जिल्हा शाखेत अशा महोत्सवाचे आयोजन केले असून त्यांची अंतिम फेरी लातूर येथे दिनांक २ ऑक्टोबर रोजी संपन्न होणार असल्याचे त्यांनी सांगितले.याप्रसंगी कुलगुरू डॉ. सपकाळ आणि कुलसचिव डॉ. गाडेकर यांनी देखील 'विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देणे ही सर्वांची जबाबदारी असल्याचे' भाष्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. प्रेषित रुद्रवार यांनी तर प्रास्ताविक जिल्हा शाखेचे अध्यक्ष आसेफ अन्सारी यांनी केले, शेवटी आभार प्रदर्शन संगीत व नाट्य विभागाचे प्रमुख डॉ. राजू सोनवणे यांनी केले. याप्रसंगी लोककलेवर आधारित निबंध स्पर्धेत आणि प्रश्नमंजुषा स्पर्धेत प्राविण्य मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.उद्घाटनानंतर समूह लोकनृत्य, वैयक्तिक लोकनृत्य,समूह लोकगीत गायन, वैयक्तिक लोकगीत गायन, लोकवाद्यवादन इत्यादी स्पर्धेत शहरातील जवळपास ४० शाळांच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. स्पर्धेसाठी प्रवीण जाधव, रमेश धोंडगे, लक्ष्मीकांत दोडके, सुमित भाले इत्यादींनी परीक्षक म्हणून काम पाहिले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उपाध्यक्ष वाल्मीक जाधव, प्राचार्य डॉ हसन इनामदार, प्रमुख कार्यवाह गोकुळ गायकवाड, कोषाध्यक्ष विनोद आघाव, सह कार्यवाह अर्चना देवधर, प्रा. संतोष कुलकर्णी, सल्लागार भाग्यरवी कुलकर्णी, मध्यवर्तीचे युवा संघटक अभिजीत भातलोंढे, कार्यकारिणी सदस्य ॲड.सुशील बनकर, लक्ष्मण अहिरे, रमेश सोळंके, प्रसाद वाघमारे, बाबू घडलिंगे,प्रा. डॉ. अस्लम शेख, प्रा. श्रीपाद पदे, उमेश तुरकने, मधुकर खिल्लारे, प्रकाश वाघ यांनी परिश्रम घेतले.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

Education of the Day
YCMOU सेंटर कोड : 21187
YCMOU मुक्त विद्यापीठात प्रवेशासाठी सुवर्णसंधी
B.A.(मराठी व उर्दू माध्यम)
M.A.- मराठी, हिंदी, उर्दू, अर्थशास्त्र, इतिहास आणि लोकप्रशासन
9405109103, 8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २९ सप्टेंबर २०२६


## जिंतूर तालुकास्तरीय योगा स्पर्धा उत्साहात; विद्यार्थ्यांचे उत्कृष्ट योगकौशल्य



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** जिंतूर तालुकास्तरीय योगा स्पर्धा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. स्पर्धेत तालुक्यातील विविध शाळांमधील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवत योगासने, संतुलन आणि लवचिकतेचे उत्कृष्ट प्रदर्शन केले. स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये योगाबद्दलची आवड वाढविण्याबरोबरच शारीरिक व मानसिक आरोग्याबाबत जनजागृती करण्याचा संदेश देण्यात आला.स्पर्धेत १४ वर्षांखालील मुलींच्या गटात पोतदार इंग्लिश स्कूल, जिंतूर येथील आरोही जाधव हिने प्रथम क्रमांक पटकावला. अक्षरा जाधव (कस्तुरबा गांधी विद्यालय) हिने द्वितीय तर स्वाती राठोड (किशनराव आघाव विद्यालय, जांब) हिने तृतीय क्रमांक मिळविला.१४ वर्षांखालील मुलांच्या गटात विक्रमादित्य कुटे याने प्रथम क्रमांक मिळविला. कृष्णासाई जगताप (सरस्वती विद्यालय, गडदगव्हाण) याने द्वितीय क्रमांक पटकावला. याच वयोगटातील आर्टिस्टिक योगा प्रकारात शिवराज बारवकर (बोरी) याने प्रथम तर कृष्णासाई जगताप याने द्वितीय क्रमांक मिळविला.१९ वर्षांखालील गटात सानवी घिके हिने उत्कृष्ट कामगिरी करत प्रथम क्रमांकावर बाजी मारली. विजेत्या विद्यार्थ्यांचे उपस्थित मान्यवरांच्या हस्ते अभिनंदन करण्यात आले.स्पर्धेच्या अध्यक्षस्थानी तालुका क्रीडा अधिकारी मिलिंद साळवे होते. प्रमुख पंच म्हणून योग शिक्षक सचिन रायपत्रीवार, प्रशांत घिके, आबासाहेब देशमुख यांनी काम पाहिले. यावेळी पालक सुरेश कुटे, शिक्षक कपिल घुगे, मनीष साळवे, क्रीडा विभागाचे मार्गदर्शक शेख शाहरुख यांच्यासह विद्यार्थी, शिक्षक व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी मान्यवरांनी विद्यार्थ्यांना नियमित योगाभ्यास करण्याचे आवाहन करत योगामुळे शारीरिक तंदुरुस्ती, मानसिक एकाग्रता आणि आत्मविश्वास वाढण्यास मदत होत असल्याचे सांगितले. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनाबद्दल सहभागी विद्यार्थी, शिक्षक आणि आयोजकांचे सर्व स्तरांतून कौतुक करण्यात आले.

## मुरुम येथे संत निरंकारी मिशनतर्फे रक्तदान शिबिर संपन्न; ६७ रक्तदात्यांचा सहभाग



*फोटो ओळ : मुरुम, ता. उमरगा येथे संत निरंकारी मिशन, मुरुम ब्रँचकडून जिल्हा परिषद कन्या प्रशालेच्या सभागृहात रक्तदान करताना मान्यवर, रक्तदाते व अन्य.*

**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशन (दिल्ली), झोन-सोलापूर, मुरुम ब्रँचच्या वतीने आयोजित जिल्हा परिषद कन्या प्रशालेच्या सभागृहात रविवारी (ता. 27) रोजी रक्तदान शिबिर उत्साहात पार पडले. सद्गुरु माता सुदीक्षा जी महाराज व आ. निरंकारी राजपिता रमित जी यांच्या कृपाशिर्वादाने आयोजित या शिबिराचे उद्घाटन सोलापूरचे झोनल प्रमुख इंद्रपालसिंह नागपालजी यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व रोपट्याला पाणी घालून करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी स्वागत गीत मनश्री मोटे यांनी म्हटले.चौकट : मानवतेचे सर्वोच्च माध्यम..... इंद्रपालसिंह नागपालजीउद्घाटन प्रसंगी बोलताना इंद्रपालसिंह नागपाल म्हणाले, संत निरंकारी मिशन 'रक्त नाल्यात नव्हे, तर मानवाच्या नाड्यात व्हायला पाहिजे' या शिकवणीनुसार कार्य करते. मानवी शरीरातील रक्तात कोणतीही जात, धर्म वा वर्णभेद नसतो. त्यामुळे रक्तदान हे केवळ वैद्यकीय मदत नसून मानवतेचे नाते जोडणारे सर्वोच्च माध्यम आहे. अध्यात्म आपल्याला संकुचित विचारांच्या पलीकडे नेऊन 'वसुधैव कुटुंबकम्'ची भावना शिकवते. चौकट : मानवी सेवा हीच ईश्वर सेवा....चांदभाई तांबोळीजीदुपारच्या सत्रात झालेल्या सत्संग सोहळ्यात ब्रह्मज्ञान प्रचारक चांदभाई तांबोळी यांनी प्रबोधन करताना सांगितले की, निरंकारी मिशन जात, धर्म आणि प्रांताच्या पलीकडे जाऊन संपूर्ण मानवतेला एकसूत्र बांधत आहे. "मानवता हाच खरा धर्म असून, मानवी सेवा हीच खरी ईश्वर सेवा आहे," असे त्यांनी नम्रपणे स्पष्ट केले. यावेळी हरियाणा येथून वस्त्र मंत्रालयातून सेवानिवृत्त माजी प्रादेशिक व्यवस्थापक डॉ. शिवाजीराव शिंदे, वैद्यकीय अधिकारी डॉ. वैभव कोरे, रोटरी क्लब मुरूम सिटीचे अध्यक्ष कल्लय्या स्वामी, महात्मा बसवेश्वर पतसंस्थेचे चेअरमन शिवशरण वरनाळे, दमाणी रक्तपेढीचे प्रमुख ललित दंडी, जिल्हा रुग्णालय रक्तपेढीचे डॉ. प्रतीक माने, पांडुरंग वाघमारे, मनोज चव्हाण, दत्तात्रय भल्ला, सुनील पिसके, ब्रँच मुखी दयानंद साखरे आदींची प्रमुख उपस्थिती होती. सत्संग सोहळ्याचे सूत्रसंचालन मीरा मोटे यांनी केले. शिबिरामध्ये एकूण 67 रक्तदात्यांनी स्वेच्छेने रक्तदान केले. रक्तदात्यांना मंडळाकडून भेटवस्तू व प्रमाणपत्र देण्यात आले. श्रीमती गोपाबाई दमाणी ब्लड सेंटर (सोलापूर) आणि जिल्हा रुग्णालय रक्तपेढी (सोलापूर) यांच्या कर्मचाऱ्यांनी रक्त संकलनाचे कार्य पार पाडले.चंद्रकांत चव्हाण, कल्लेश्वर पांचाळ, सुरेश कोळी, तुकाराम शेवाळे, रमेश मिनियार, हरिकिशन पवार, सुधाकर नारायणकर, सुधीर पंचगल्ले, हणमंत मंडले, सुरेश मंडले, गुलाब मंडले, परमेश्वर मंडले, लक्ष्मण राठोड, सुभाष घोरपडे, युवराज बनसोडे, हणमंत पोतदार आदींनी पुढाकार घेतला. सेवादल इन्चार्ज बिरू बंदीछोडे, शिवानंद बिराजदार, दत्तात्रेय बोडरे, प्रसाद सुपेकर, विष्णू पवार, गुंडेराव चौगुले, अनुसया नारायणकर, उषा साखरे, गुरुदेवी बोडरे यांनी पुढाकार घेतला. कमल शेवाळे, सुनिता व्हटकर, मुक्ताबाई कोळी, अनिता जामगे आदींनी रक्तदात्यांची व्यवस्था केली. प्रा. डॉ. महेश मोटे यांनी सूत्रसंचालन तर आभार दयानंद साखरे यांनी मानले. या सोहळ्याकरिता जिल्हाभरातून विविध क्षेत्रातील मान्यवर, निरंकारी सेवा दल, महापुरुष, माता-बहिणजी, नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते.


१२ वी सायन्स व B.Sc. पास विद्यार्थ्यांसाठी

शासन मान्यताप्राप्त जॉबगॅरंटी कोर्सेस

DMLT
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स

PGDMLT
कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर)
पात्रता : B.Sc.
(Microbiology, Chemistry, Botany, Zoology, Biochemistry, MLT, CLS)

X-RAY
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

C.T.SCAN
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

E.C.G.
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

O.T. TECHNICIAN
कालावधी २ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

PG RADIOLOGY
कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर)
पात्रता : B.Sc. Physics

रेडिओलॉजी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

फिजिओथेरपी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

ऑप्टोमेट्री
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

9405109103 | 8830838903



१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा) विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी

D.M.L.T

Diploma In Medical Laboratory Technology

- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला अॅडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २९ सप्टेंबर २०२६


## जिंतूर तालुक्यातील दुष्काळग्रस्त भागाची मा. आ. विजयराव भांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली पाहणी;



जिंतूर (बी. डी. रामपूरकर) : जिंतूर तालुक्यात पडलेल्या तीव्र दुष्काळामुळे आणि पावसाच्या खंडामुळे शेतकऱ्यांच्या हातातून खरीप पिके पूर्णपणे गेली आहेत. या पार्श्वभूमीवर, शेतकऱ्यांना धीर देण्यासाठी आणि त्यांच्या पिकांच्या झालेल्या अतोनात नुकसानीची वस्तुस्थिती जाणून घेण्यासाठी मा.आ.विजयराव भांबळे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली जिंतूर तालुक्यातील दुष्काळग्रस्त भागाचा एक महत्त्वाचा 'पिक पाहणी दौरा' आयोजित करण्यात आला होता. गुरुवार, दिनांक 24 सप्टेंबर 2026 रोजी दुपारी 12:30 वाजता रायखेडा (ता. जिंतूर) शेतकऱ्यांच्या थेट शेतातील बांधावर जाऊन पिकांची प्रत्यक्ष पाहणी केली. यामध्ये सोयाबीन, कापूस, तूर आणि इतर खरिपाच्या पिकांचे जे अतोनात नुकसान झाले आहे, त्याचे गांभीर्य समजून घेतले. पावसाअभावी पिके कशी जळून खाक झाली आहेत, हे स्वतः उपस्थित राहून पाहिले आणि संकटग्रस्त शेतकरी बांधवांशी संवाद साधून त्यांना धीर दिला. शेतकऱ्यांनी आपल्या व्यथा मांडत शासनाने तात्काळ पंचनामे करून आर्थिक मदत देण्याची मागणी केली आहे.या प्रसंगी मा. आ. विजयराव भांबळे साहेब यांनी बोलताना सांगितले की, "जिंतूर तालुक्यातील शेतकरी सध्या अत्यंत मोठ्या संकटात सापडला आहे. निसर्गाच्या लहरीपणामुळे पिके उद्ध्वस्त झाली असून, शेतकऱ्यांचे आर्थिक बजेट पूर्णपणे कोलमडले आहे. आम्ही या दुष्काळी परिस्थितीची आणि झालेल्या नुकसानीची सविस्तर माहिती शासनाकडे मांडणार आहोत. जिंतूर तालुक्यात तात्काळ दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना हेक्टरी 50 हजार रुपये तर फळ बागास १ लक्ष रुपये एवढी भरीव मदत, शेतकऱ्यांच्या पाळीव प्राण्यासाठी चारा छावणी, नागरिकांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था पीक विमा, मागच्या वर्षीचा विमा व ईतर दुष्काळातील सुविधा मिळेपर्यंत आमचा लढा सुरू राहील."या महत्त्वपूर्ण पाहणी दौऱ्याला ता.अ. लक्ष्मणराव बुधवंत, माजी जि.पं.सदस्य विश्वनाथ राठोड, मुरलीधर मते, विठ्ठलरा घोगरे, पं.स.सदस्य अविनाश मस्के, यांच्यासह देऊ राठोड, मांगीलाल राठोड, दिनकर दहिभाते, फत्तुसिंग पवार, अशोक प्रधान, नामदेव तुपसुंदर, परमेश्वर मुधवर, हकीम लाला, संग्राम पिंपळकर, सुंदर तीर्थे, यांच्यासह परिसरातील शेतकरी बांधव, स्थानिक लोकप्रतिनिधी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पेरियार जयंतीनिमित्त विशेष अभ्यास वर्गाच्या पूर्वतयारीसाठी सुभेदारी विश्रामगृहात बैठक



छत्रपती संभाजीनगर : सार्वजनिक पेरियार ई. व्ही. रामासामी जयंतीनिमित्त आयोजित विशेष अभ्यास वर्गाच्या पूर्वतयारीसाठी शासकीय सुभेदारी विश्रामगृह येथे बैठक घेण्यात आली. 17 सप्टेंबर रोजी पेरियार यांची जयंती झाल्यानंतर आयोजित करण्यात येणाऱ्या या विशेष अभ्यास वर्गाच्या नियोजनाबाबत बैठकीत चर्चा करण्यात आली. आत्म-सन्मान आंदोलन राष्ट्रीय स्तरावर पुनर्जीवित आणि पुनर्स्थापित करणे आवश्यक का आहे? तसेच पेरियार यांच्या आत्म-सन्मान आंदोलनाची अपूर्ण राहिलेली उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आपण काय केले पाहिजे? या विषयांवर विशेष अभ्यास वर्ग आयोजित करण्यात आला आहे. या अभ्यास वर्गात पेरियार : मिथक आणि वास्तव या पुस्तकाचे लेखक व अभ्यासक दीपक गायकवाड प्रमुख संबोधक म्हणून मार्गदर्शन करणार आहेत. कार्यक्रमाचे उद्घाटन माजी जिल्हा न्यायाधीश डी. आर. शेळके यांच्या हस्ते होणार असून अध्यक्षस्थानी फुले-आंबेडकरी अभ्यास समूहाचे संयोजक प्रशांत मस्के राहणार आहेत. विशेष अभ्यास वर्ग रविवार, 4 ऑक्टोबर 2026 रोजी सकाळी 10 वाजता मराठवाडा महसूल प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरप्रीत हॉटेलजवळ, जालना रोड, छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित करण्यात आला आहे. बैठकीस प्राचार्य सुनील वाकेकर, भीमराव सरवदे, अक्रम खान, गुणरत्न सोनवणे, अॅड. डी. व्ही. खिल्लारे, प्रा.धन्यकुमार टिळक, विद्या सोनवणे, किर्तिलता पेटकर, अरविंद कांबळे, लखन वानखेडे, डॉ.देवधन धुवे, दिनेश मगरे यांच्यासह समितीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## एम.फिल. विद्यार्थिनींच्या पीएच.डी. प्रवेशासाठी समाज कल्याण मंत्री तथा पालकमंत्र्यांचे विद्यापीठाला पत्र

छत्रपती संभाजीनगर : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील वृत्तपत्रविद्या, ग्रंथालयशास्त्र, पाली अँड बुद्धिझम, हिंदी, अर्थशास्त्र, मराठी, कॉम्प्युटर सायन्स, इतिहास, शारीरिक शिक्षण, राज्यशास्त्र यासह इतर विद्याशाखांमधील सन २०१९-२० व २०२०-२१ या शैक्षणिक वर्षातील एम.फिल. उत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या पीएच.डी. प्रवेशाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. यासंदर्भात संशोधक विद्यार्थी प्रभू राऊत, अमरदिप हिवराळे, गणेश धांडे, दिपक पाईकराव, प्रिती जाधव, उत्कर्षा एंगडे यांच्यासह आदी विद्यार्थी व विद्यार्थिनींनी समाज कल्याण मंत्री तथा छत्रपती संभाजीनगरचे पालकमंत्री संजय शिरसाट यांना १९ सप्टेंबर २०२६ रोजी निवेदन दिले. या निवेदनाची दखल घेत समाज कल्याण मंत्री तथा पालकमंत्री संजय शिरसाट यांनी २१ सप्टेंबर २०२६ रोजी विद्यापीठाच्या प्र-कुलगुरूंना पत्र पाठविले आहे. एम.फिल. ते पीएच.डी. (JRF to SRF) फेलोशिप प्राप्त विद्यार्थ्यांना पीएच.डी. प्रवेश देण्याबाबत तसेच जनसंवाद व वृत्तपत्रविद्या विभागातील एम.फिल. विद्यार्थ्यांना अंतरविद्याशाखीय पद्धतीने पीएच.डी. प्रवेश देण्याबाबत विद्यार्थ्यांनी निवेदनातून मागणी केली आहे. पालकमंत्री संजय शिरसाट यांनी विद्यापीठाच्या प्र-कुलगुरूंना पाठविलेल्या पत्रात संबंधित विद्यार्थ्यांची शैक्षणिक पात्रता, फेलोशिपची मंजुरी, लागू नियम, विद्यापीठाचा पीएच.डी. अध्यादेश तसेच यापूर्वी विद्यापीठाने घेतलेले निर्णय यांचा सर्वंकष विचार करून प्रकरणाची तातडीने तपासणी करण्याचे नमूद केले आहे. विद्यार्थ्यांनी दिलेल्या निवेदनानुसार, वृत्तपत्रविद्या, ग्रंथालयशास्त्र, पाली अँड बुद्धिझम, हिंदी, अर्थशास्त्र, मराठी, कॉम्प्युटर सायन्स, इतिहास, शारीरिक शिक्षण, राज्यशास्त्र यासह इतर विद्याशाखांमधील सन २०१९-२० व २०२०-२१ या शैक्षणिक वर्षातील एम.फिल. उत्तीर्ण विद्यार्थ्यांना केंद्र व राज्य शासनाच्या संबंधित संस्थांमार्फत एम.फिल. ते पीएच.डी. (JRF to SRF) फेलोशिप मंजूर आहे. विद्यापीठाच्या पूर्वीच्या निर्णयानुसार एम.फिल. उत्तीर्ण तसेच JRF to SRF फेलोशिप प्राप्त विद्यार्थ्यांच्या पीएच.डी. प्रवेशाची प्रक्रिया सुरू करण्यात आली होती. याच बॅचमधील अनेक विद्यार्थ्यांना पीएच.डी. प्रवेश देण्यात आल्याचा दावा विद्यार्थ्यांनी केला आहे. मात्र, उर्वरित पात्र विद्यार्थ्यांची पीएच.डी. प्रवेश प्रक्रिया प्रलंबित अथवा थांबविण्यात आल्याने त्यांच्या शैक्षणिक भवितव्याचा प्रश्न निर्माण झाल्याचे विद्यार्थ्यांनी निवेदनात म्हटले आहे. पीएच.डी. प्रवेशाची प्रक्रिया सुरू असतानाच ती थांबविण्यात आल्याचा आरोपही निवेदनातून करण्यात आला आहे. जनसंवाद व वृत्तपत्रविद्या विभागातील विद्यार्थ्यांच्या अंतरविद्याशाखीय पीएच.डी. प्रवेशाचाही मुद्दा निवेदनात मांडण्यात आला आहे. संशोधन विषय इतर संबंधित विषयाशी निगडित असल्यास त्या विषयातील मार्गदर्शकाच्या मार्गदर्शनाखाली पीएच.डी. करण्याची संधी मिळावी, अशी मागणी विद्यार्थ्यांनी केली आहे. दरम्यान, समाज कल्याण मंत्री तथा पालकमंत्री संजय शिरसाट यांनी आपल्या पत्रात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताचा व भवितव्याचा विचार करून, लागू नियम व विद्यापीठाच्या वैधानिक तरतुदींनुसार पात्र विद्यार्थ्यांना एम.फिल. ते पीएच.डी. प्रवेश देण्याबाबत सकारात्मक व तातडीने योग्य ती कार्यवाही करण्याचे नमूद केले आहे. तसेच जनसंवाद व वृत्तपत्रविद्या विभागातील पात्र विद्यार्थ्यांच्या अंतरविद्याशाखीय पीएच.डी. प्रवेशाच्या मागणीचाही सहानुभूतीपूर्वक विचार करण्यात यावा, असे पत्रात नमूद करण्यात आले आहे. समाज कल्याण मंत्री तथा पालकमंत्र्यांच्या पत्रानंतर आता विद्यापीठ प्रशासनाकडून या प्रकरणाची नियमांनुसार तपासणी करून पुढील कार्यवाही काय केली जाते, याकडे संबंधित विद्यार्थ्यांचे लक्ष लागले आहे.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स अँण्ड प्रिंटर्स

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.

मो. 8087880274,8956362639, 9270446603, 9405109103

डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ट कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274

Email - sahilcomputer05@gmail.com

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २९ सप्टेंबर २०२६


## गर्दीपासून एकटेपणापर्यंत

आंबेडकरी चळवळ ही विचारांची चळवळ आहे, असे आपण अभिमानाने म्हणतो. पण प्रत्येक चळवळीच्या इतिहासात एक प्रश्न कायम उभा राहतो—विचारांसाठी जगणारे किती आणि विचारांच्या नावावर स्वतःचे घर भरणारे किती?ही कथा अशाच एका नेत्याची आहे.त्याचे नाव होते विक्रमराव.तो सुरुवातीला सामान्य कार्यकर्ता होता. खांद्यावर निळा झेंडा, हातात पत्रके आणि डोक्यात बाबासाहेबांचे विचार घेऊन तो गावोगाव फिरायचा. उन्हातान्हात सभा घ्यायचा. लोकांच्या अडचणी ऐकायचा. कोणाच्या मुलाला शिष्यवृत्ती मिळाली नाही तर कार्यालयात धाव घ्यायचा. कोणावर अन्याय झाला तर त्याच्या दारात उभा राहायचा.त्याच्यासोबत कार्यकर्ते कायम असत..कार्यकर्त्याला प्रसिद्धीची हाव नव्हती. मंचावर आपले नाव यावे, फोटो वर्तमानपत्रात छापून यावा, सत्कार व्हावा, याची त्यांना कधीच अपेक्षा नव्हती. त्यांना फक्त एकच गोष्ट माहीत होती—"माणूस मोठा होण्यासाठी नाही, तर माणसाला मोठं करण्यासाठी चळवळ असते."काळ पुढे गेला.विक्रमरावचा प्रभाव वाढू लागला.लोक त्याच्यावर प्रेम करू लागले. त्याच्या सभांना गर्दी होऊ लागली. नेत्यांचे फोन येऊ लागले. सत्कार होऊ लागले. गाड्या दारात थांबू लागल्या.आणि हळूहळू विक्रमराव बदलू लागला.ज्यांच्या खांद्यावर बसून तो मोठा झाला, त्यांचे खांदे त्याला दिसेनासे झाले.कार्यकर्ते मात्र तिथेच होते.कार्यकर्ते लोकांच्या घरी जात होते . एखाद्या कार्यकर्त्याच्या घरात आजारपण असेल तर औषध घेऊन पोहोचत होते . कुणाच्या मुलाचे शिक्षण थांबू नये म्हणून मदत करत होते. एखाद्या कार्यकर्त्याच्या घरी दुःखद निधन झाले तर सर्वात आधी कार्यकर्ते .विक्रमराव मात्र आता मोठा नेता झाला होता.त्याच्याकडे पैसा होता.पण माणसं नव्हती.त्याच्या खिशात नोटा वाढत होत्या आणि मनातली माणुसकी कमी होत होती.लोकांनी मात्र त्याला लगेच सोडले नाही.त्याचा वाढदिवस आला की गाव सजायचे.केक कापला जायचा.फटाके वाजायचे.सोशल मीडियावर शुभेच्छांचा पाऊस पडायचा.फक्त विक्रमरावच नव्हे, त्याच्या घरातील प्रत्येकाचे वाढदिवस लोक लक्षात ठेवायचे.त्याच्या मुलाचा वाढदिवस असो, मुलीचा असो, बायकोचा असो किंवा त्याच्या घरातील कुणा अगदीच दूरच्या व्यक्तीचा असो—कार्यकर्ते शुभेच्छा द्यायला धावायचे.पण दुसरीकडे कार्यकर्त्यांचे वाढदिवस कधी यायचे आणि कधी जायचे , हे नेत्याला माहीतही नसायचे.नेता शुभेच्छा द्यायचा अन लगेच कार्यकर्ताला कोणत्या हॉटेलमध्ये जेवण देतो मग कबूल करून घायचा म्हणजे वाढदिवसाच्या शुभेच्छाच्या ठिकाणी नेत्याला जेवण महत्वाचे...विक्रमरावच्या सुखात हजारो माणसे होती.पण दुसऱ्याच्या सुख - दुःखात तो क्वचितच दिसायचा.पण स्वतःचा कार्यक्रम असेल तर हजारो लोक हवे.हळूहळू लोकांना हे जाणवू लागले.प्रेमात माणूस बराच काळ चुका माफ करतो.पण सतत वापरले गेले की प्रेमाचे रूपांतर प्रश्नात होते.कार्यकर्ते कुजबुजू लागले—"आपण याच्यासाठी किती धावलो?""आपल्या घरात दुःख असताना हा आला का?""आपल्या मुलांच्या शिक्षणासाठी याने कधी विचारला?""मग आपण याच्या प्रत्येक सुखात का उभे राहायचे?"आणि एक दिवस गर्दी कमी झाली.विक्रमरावची सभा होती.नेहमीप्रमाणे त्याला वाटले—लोक येतील.पण सभेत खुर्च्या रिकाम्या राहिल्या.त्याने मंचावरून गर्दीकडे पाहिले.पहिल्या रांगेत काही चेहरे होते.पण तेही पूर्वीसारखे नव्हते.ज्यांच्या नावाने तो मोठा झाला होता, ते कार्यकर्ते कुठेच नव्हते.त्याला पहिल्यांदा जाणवले—गर्दी माझी नव्हती.ती माझ्यावर विश्वास ठेवणाऱ्या माणसांची होती.त्याला स्वतःची चूक थोडीशी जाणवली.पण गुर्मी अजूनही शिल्लक होती.त्याने स्वतःला समजावले—"लोक पुन्हा येतील."पण लोक पुन्हा आले नाहीत.हळूहळू विक्रमरावच्या मनात अस्वस्थता वाढू लागली. तो चिडचिड करू लागला, त्याला प्रत्येक माणूस संशयास्पद वाटू लागला. गुणवंत लोकांच्या गुणवत्तेवर तो शंका घेऊ लागला,त्यांच्या प्रामाणिकपणावर तो शंका घेऊ लागला. कुणी त्याच्याशी सहमत नसेल तर तो त्याला शत्रू समजू लागला. स्वतःच्या चुका मान्य करण्याऐवजी तो इतरांवर आरोप करू लागला, पाठीमागे बदनामी करू लागला,टिंगल करू लागला, स्वतः चे अंग पूर्ण गटाराने भरलेले पण दुसऱ्यावर शिंतोडे उडवू लागला आणि कधी कधी पागलासारखा वागू लागला.इतका अहंकार वाढला की कार्यकर्त्याला शिव्या देऊ लागला अपमानित करू लागला,,नको तिथे हे मी केले म्हणून झाले. विनाकारण मिरवू लागला, लोकांना दुसऱ्यामार्फत ब्लॅकमेल करू लागला अन् ब्लॅकमेल करून स्वतः तडजोड करू लागला. त्याच्यामुळे कार्यकर्ते हळूहळू दूर होत गेले.घरातही परिस्थिती बदलली.घरात पैसा भरपूर होता.पण घरात प्रेम नव्हते.विक्रमरावच्या लक्षात आले की ज्या घरासाठी त्याने पैसा जमवला, त्या घरात त्याच्यासाठी जागाच उरली नव्हती.तो सकाळी घराबाहेर पडायचा.दिवसभर इकडे तिकडे फिरायचा.एखाद्या कार्यकर्त्याकडे बसायचा.कुणी चहा दिला तर प्यायचा.कुणी जेवायला बोलावले तर जेवायचा.खिशात हजारो रुपये असायचे.पण स्वतःच्या पैशाने चहा घ्यायला त्याचा हात खिशात जायचा नाही.हा त्याचा स्वभावच झाला होता.ज्याने आयुष्यभर लोकांकडून घेतले, त्याला देण्याची सवयच नव्हती.एकदा तो एका जुन्या कार्यकर्त्याकडे गेला.तो कार्यकर्ता म्हणजे सुरेश.सुरेशने त्याला पाहिले.विक्रमराव थकलेला होता.डोळ्यांत पूर्वीची चमक नव्हती.सुरेशने काहीही विचारले नाही.फक्त म्हणाला—"या, जेवून घ्या."विक्रमरावने त्याच्याकडे पाहिले.त्याच्या डोळ्यांत पाणी आले.तो म्हणाला—"सुरेश, तू अजूनही माझ्यावर प्रेम करतोस?"सुरेश शांतपणे म्हणाला—"मी तुमच्यावर नाही.मी त्या जुन्या विक्रमवर, जो कधीतरी आमच्यासोबत उन्हात चालला होता."विक्रमराव काही बोलला नाही.सुरेश पुढे म्हणाला—"तुम्ही नेता झालात, तेव्हा आम्ही आनंदी झालो. पण तुम्ही नेता होताना कार्यकर्ता हरवला. आम्हाला तुमची सत्ता नको होती. आम्हाला तुमच्यातला माणूस हवा होता."त्या दिवशी पहिल्यांदा विक्रमरावने आपला चेहरा आरशात पाहिला.त्याला चेहरा दिसला नाही.त्याला आपल्या आयुष्याची पोकळी दिसली.खिशात पैसा होता.पण सोबत कुणी नव्हते.नाव होते.पण विश्वास नव्हता.भूतकाळ होता.पण आपले म्हणावे असे वर्तमान नव्हते.आणि सर्वांत मोठी शोकांतिका—ज्या माणसांनी त्याला मोठे केले, त्यांच्यावर त्याने कधी प्रेम केलेच नव्हते.तो उठला.सुरेशच्या पायाशी बसला.सुरेशने त्याला उठवले.विक्रमराव म्हणाला—"माझ्याकडून चूक झाली."सुरेश म्हणाला—"चूक मान्य केलीत तर अजून उशीर झालेला नाही."विक्रमरावने डोळे पुसले.पण त्याच्या चेहऱ्यावरची गुर्मी अजून पूर्णपणे गेली नव्हती.सुरेश हसला आणि म्हणाला—"गुर्मी सोडली नाही तर पुन्हा एक दिवस तुम्हाला तुमची सावलीही दिसणार नाही ."दोघेही शांत झाले.बाहेर सूर्य मावळत होता.विक्रमरावच्या आयुष्यात मात्र एक वेगळाच अंधार उतरला होता.त्याला आता समजले होते—नेता कार्यकर्त्यांच्या जीवावर मोठा होतो; पण कार्यकर्त्यांच्या मनात जगण्यासाठी त्याला माणूस राहावे लागते.जनता मूर्ख नसते.ती बराच काळ माफ करते.ती नेत्याच्या सुखात उभी राहते.त्याच्या दुःखात धावते.त्याच्या मुलांच्या वाढदिवसापासून घरातील प्रत्येक आनंद लक्षात ठेवते.पण एक दिवस ती हिशेब करत नाही—तर फक्त दूर जाते.आणि जनता दूर गेल्यावर कोणताही नेता कितीही पैसा कमावो, कितीही मोठे पद मिळवो—त्याच्या सभोवती गर्दी असू शकते;पण त्याच्या आयुष्यात माणसं उरलेली नसतात.हीच स्वार्थी नेतृत्वाची खरी शोकांतिका.आणि प्रामाणिक कार्यकर्त्यांची खरी श्रीमंतीही याच ठिकाणी आहे—त्याच्याकडे कदाचित पैसा नसतो, सत्ता नसते, मोठे पद नसते;पण कुणाच्या दुःखात त्याला आठवणारे दोन माणसं असतात.कारण चळवळ नावाने मोठी होत नाही.माणसांच्या विश्वासाने मोठी होते.आणि नेता घोषणांनी मोठा होत नाही.तो कार्यकर्त्यांच्या त्यागाने मोठा होतो.पण तोच कार्यकर्त्यांचा विश्वास विकतो, तेव्हा त्याची उंची संपत नाही—त्याची माणुसकी संपते.


**डॉ. बाळासाहेब लिहिणार**
**छत्रपती संभाजीनगर**
**मो. +91 94212 45309**


## श्री संत सावता माळी महाविद्यालयात वाङ्मय मंडळ उदघाटन व हिंदी सप्ताह समापन समारोह संपन्न



**फुलंब्री :** श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री येथे "वाड.मय मंडळ उदघाटन" व "हिंदी सप्ताह समापन समारोह" संपन्न झाला. याप्रसंगी वाड.मय मंडळ उदघाटनासाठी कला व विज्ञान महाविद्यालयाच्या प्राचार्या, डॉ. अनिता खंडागळे उपस्थित होत्या तर प्रमुख उपस्थिती म्हणून यशवंतराव चव्हाण कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सिल्लोड येथील हिंदी विभागप्रमुख, डॉ. ज्ञानेश्वर रानभरे यांची उपस्थिती लाभली. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. एस.आर.टकले उपस्थित होते.वाड.मय मंडळ उदघाटनप्रसंगी बोलत असताना डॉ. खंडागळे म्हणाल्या की, भाषा ही मानवाच्या विकासाचे साधन आहे. भाषा कोणतीही असो. ती मानव विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. त्यामुळे आपला संवाद कसा आहे. यावर आपली भाषा संकृती समजण्यास मदत होत असते. म्हणून भाषेला डावलून मानवी कोणताही व्यवहार साध्य होत नाही. असे मत व्यक्त केले. तर डॉ. रानभरे यांनी भाषेची उत्क्रांती व भाषा ही ईश्वरनिर्मित नसून ती मानव निर्मित आहे. याअनुषंगाने भाषा व मानव तसेच समाज यांच्या विकासात महत्वाची भूमिका बजावत असते. असे म्हणत भाषेचा इतिहास मांडला.अध्यक्षीय समारोप प्राचार्य, डॉ. एस.आर.टकले यांनी केला. कार्यक्रमाची भूमिका डॉ. दत्तात्रय येडले यांनी मांडली.तर पाहुण्यांचा परिचय डॉ. संजीवकुमार पांचाळ यांनी करून दिला.या सोहळ्याचे सूत्रसंचालन डॉ. सुरेश मुंढे यांनी केले. तर उपस्थित मान्यवरांचे आभार मराठी विभागप्रमुख, डॉ. राजश्री पवार यांनी मानले. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## हिंदी पखवाडा समारोप समारंभ संपन्न

**गुंजोटी (प्रा.नागसेन कांबळे) :** येथील श्रीकृष्ण महाविद्यालयात गेल्या पंधरा दिवसापासून विविध उपक्रमाने चालू असलेल्या हिंदी पंधरवडा दिनाचा आज समारोप समारंभ संपन्न झाला. हिंदी भाषेचा प्रचार आणि प्रसार व्हावा या हेतुने देशभरात विविध कार्यक्रम साजरे केले जातात. विशिष्ट भागात हिंदी भाषेला विरोध केला जातो या अवास्तव संकल्पनेला मुठमाती देण्यासाठी आणि राष्ट्रभाषा हिंदीला जास्तीत जास्त लोकाभिमुख करण्यासाठी , व्यवहारात आणि व्यावसायिक कौशल्यासाठी हिंदीची उपयुक्तता सिद्ध व्हावी यासाठी सतत विविध कार्यक्रम आणि उपक्रमाचे आयोजन केले जाते, याचाच भाग म्हणून गेले पंधरा दिवस विद्यार्थी व प्राध्यापकासाठी विविध उपक्रम व कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यात विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धा व वक्तृत्व स्पर्धा, प्रश्नमंजुषा, सामान्यज्ञान स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. विशेष म्हणजे यात प्राध्यापकांसाठी ही वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.आजच्या " हिंदी पखवाडा 2026 समापन समारोह " कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या म्हणून ख्वाजा बांडे बंदेनवाज विश्वविद्यालय कालबुर्गीच्या हिंदी विभागप्रमुख प्रा. डॉ. अफशा देशमुख उपस्थित होत्या, यावेळी व्यासपीठावर श्रीकृष्ण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गुलाब राठोड , प्रा. डॉ. बालाजी कोनाळे उपस्थित होते. यावेळी प्रा. डॉ. अफशा देशमुख म्हणाल्या की, दि. 14 सप्टेंबर 1949 ला संविधान सभेमध्ये देवनागरी लिपीत हिंदी भाषेला अधिकृतपणे राजभाषेचा दर्जा देण्यात आला. भारत हा खंडप्राय देश तर आहेच त्याचबरोबर तो विविध भाषा, प्रांत आणि संस्कृतीने नटलेला देश आहे. भारत देश एकसंघ राष्ट्र म्हणून उभे राहण्यासाठी बहुतांश भागात बोलली जाणारी व समजली जाणारी भाषाच, राष्ट्रभाषा म्हणून स्वीकारणे योग्य होते. असे सांगून प्रा.डॉ. देशमुख यांनी हिंदी भाषेचे आजचे महत्त्व, हिंदी भाषेची आजची उपयुक्तता आणि हिंदी भाषेमुळे निर्माण झालेल्या विविध अशा रोजगारकुशल संधीविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. गुलाब राठोड यांनी हिंदी भाषेच्या पंधरवड्यासंबंधी विवेचक माहिती सांगून हिंदी भाषेचे राष्ट्रविकासात असलेले महत्त्व सांगत अशा कार्यक्रमाची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन केले. त्यानंतर वक्तृत्व आणि निबंध स्पर्धेत पारितोषिक पटकावलेल्या कु.साईरजणी विलास व्हटकर, कु .आकांक्षा म्हेत्रे, कु.गायत्री पालवे, कु.स्वाती शिंदे, कु.मानसी संजीव पवार, कु.श्वेता संजय देशमुख,प्रा.अंकिता जाधव,प्रा.संतोषी गायकवाड,प्रा. ऋतुजा काजळे या विद्यार्थी व प्राध्यापकांचा स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे सविस्तर प्रास्ताविक हिंदी विभागप्रमुख प्रा. डॉ. बालाजी कुनाळे यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. उमाकांत सूर्यवंशी यांनी केले. राष्ट्रगीतानंतर कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक, प्राध्यापकेतर सर्व कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.


**बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002**

**महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.**
**कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.**
**संपर्क क्र. 7588005002**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २९ सप्टेंबर २०२६


## उद्याचे नियोजन

संध्या समयी सुचते मला,
तुझ्या सोबतीने कविता.
केशरी रंगात शोभून दिसते,
डोंगरातून वाहणारी सविता. १

केशरी संध्या खुणावते,
सखी समुद्रकिनारी फिरावे.
फिरता फिरता एकमेकांच्या,
हृदयात अलगद शिरावे. २

समुद्रकिनारी जलाशयावर,
हळूहळू पसरला केशरी रंग.
प्रियकर प्रेयसी झालेत पहा,
हितगुज करण्यात किती दंग. ३

संध्याकाळच्या छायेत,
उद्याचे नियोजन करू.
आजच्या सारखेच आपण,
कायम हातात हात धरू. ४

संध्याकाळच्या वेळी,
सखी दोघे शपथ घेऊ.
मरेपर्यंत आपण दोघे,
एकमेकांना साथ देऊ. ५

संध्याकाळच्या छायेत,
चल आनंदात पुन्हा न्हाऊ.
प्रेमाच्या शीतल छायेत.
प्रेमाचे गीत आपण गाऊ. ६



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

## शिवछत्रपती गणेश मित्र मंडळ खेड्याचा नाविन्यपूर्ण गणेशोत्सव ठरला भक्ती, प्रबोधन आणि संस्कृतीचा अनोखा संगम



**खेडा, ता. कन्नड :** गणेशोत्सव म्हणजे केवळ मनोरंजन आणि जल्लोष न राहता त्याला भक्ती, अध्यात्म, प्रबोधन आणि संस्कारांची जोड देत शिवछत्रपती गणेश मित्र मंडळ, खेडा यांच्या वतीने यंदाचा गणेशोत्सव अत्यंत नाविन्यपूर्ण पद्धतीने साजरा करण्यात आला. आठ दिवस कीर्तनांचा जागर, एक दिवस प्रबोधनात्मक व्याख्यान आणि टाळ-मृदंगाच्या गजरात गणरायाची मिरवणूक, यामुळे मंडळाचा गणेशोत्सव परिसरात विशेष आकर्षणाचा विषय ठरला.गणेशोत्सवाच्या निमित्ताने सलग आठ दिवस विविध कीर्तनांचे आयोजन करण्यात आले. या कीर्तनांच्या माध्यमातून संतविचार, अध्यात्म, संस्कार, सामाजिक बांधिलकी आणि माणुसकीचा संदेश ग्रामस्थांपर्यंत पोहोचविण्यात आला. या कीर्तनमालेत ह. भ. प. अशोक महाराज दरेकर (खेडा), ह. भ. प. किशोर महाराज कोरडे (आलापूर), ह. भ. प. सागर महाराज दहातोंडे (खेडा), ह. भ. प. शंकर महाराज काळे (एरंडेश्वर, परभणी), ह. भ. प. मनीष महाराज झाल्टे (श्री पांडुरंग वारकरी शिक्षण संस्था, बहिरगाव-डोणगाव), ह. भ. प. सागर महाराज बोर्डे (वैसपूर) आणि ह. भ. प. गौरव महाराज खरे (खेडा) यांनी आपल्या रसाळ व प्रभावी कीर्तनातून उपस्थितांना संतविचारांची मेजवानी दिली.तरुणाईसाठी संतविचारांचे प्रबोधनगणेशोत्सवाच्या निमित्ताने युवा व्याख्याते मा. संदीप वाकडे सर यांचे ‘भरकटलेल्या तरुणाईला जागी करण्यासाठी संत विचारांची गरज’ या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले.आजच्या बदलत्या जीवनशैलीत मोबाईल, सोशल मीडिया, व्यसनाधीनता आणि वाढता स्वार्थ यामुळे तरुणाईसमोरील आव्हाने वाढत असताना संतांच्या विचारांची आणि संस्कारांची गरज किती महत्त्वाची आहे, यावर व्याख्यानातून मार्गदर्शन करण्यात आले. ज्ञानेश्वर माऊली, संत तुकाराम महाराज, समर्थ रामदास, संत गाडगेबाबा आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या विचारांचा जागर करत तरुणांनी माणुसकी, कर्तव्य, संस्कार आणि सामाजिक जबाबदारीची वाट धरावी, असा संदेश देण्यात आला.टाळ-मृदंगाच्या गजरात गणरायाला भावपूर्ण निरोपगणेशोत्सवाच्या सांगतेनिमित्त गणरायाची पारंपरिक पद्धतीने मिरवणूक काढण्यात आली. टाळ-मृदंगाचा गजर, हरिनामाचा जयघोष आणि भक्तिमय वातावरणात ग्रामस्थांनी मोठ्या उत्साहात गणरायाला निरोप दिला. युवक, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि बालगोपालांनी मिरवणुकीत उत्स्फूर्त सहभाग घेतला.डीजेच्या दणदणाटापेक्षा कीर्तन, हरिनाम, टाळ-मृदंग आणि संतविचारांना प्राधान्य देत मंडळाने उत्सवाला विधायक स्वरूप दिले. त्यामुळे भक्तीबरोबरच संस्कार आणि प्रबोधनाचा संदेश समाजापर्यंत पोहोचला.समस्त भजनी मंडळांचे अनमोल सहकार्यया संपूर्ण गणेशोत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी समस्त भजनी मंडळ, खेडा यांचे अनमोल सहकार्य लाभले. कीर्तनमाला, धार्मिक कार्यक्रम तसेच मिरवणुकीत भजनी मंडळांच्या सदस्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत उत्सवाचे वातावरण अधिक भक्तिमय केले.‘उत्सव आनंदाचा असावा, पण त्यातून समाजाला विचार आणि संस्कारही मिळावेत’ हा विचार प्रत्यक्षात आणत शिवछत्रपती गणेश मित्र मंडळ, खेडा यांनी यंदाचा गणेशोत्सव साजरा केला. त्यामुळे आठ दिवसांचा कीर्तनांचा जागर, संतविचारांचे व्याख्यान आणि टाळ-मृदंगाच्या गजरातील मिरवणूक, या त्रिसूत्रीमुळे खेड्याचा गणेशोत्सव भक्ती, प्रबोधन आणि संस्कृतीचा अनोखा संगम ठरला.

## मिल्लिया महाविद्यालयात नवीन मतदार नाव नोंदणी शिबिर संपन्न




**बीड :** येथील मिल्लिया कला, विज्ञान व व्यवस्थापनशास्त्र महाविद्यालयात, निवडणूक साक्षरता मंच, माननीय जिल्हा व तालुका निवडणूक प्रशासन विभाग बीड व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने नवीन मतदारांच्या नाव नोंदणीसाठी विशेष शिबिराचे आयोजन सोमवार दि. २८ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी ५: ०० वाजेपर्यंत महाविद्यालयाच्या परिसरात करण्यात आले होते. शिबिराचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहम्मद इलयास फाजील यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांनी विद्यार्थ्यांना मतदार नोंदणीचे महत्त्व, मतदानाचा अधिकार व लोकशाही प्रक्रियेत युवकांची भूमिका याबाबत मार्गदर्शन केले.18 वर्षे पूर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी आपले नाव मतदार यादीत नोंदवून मतदानाचा हक्क बजावावा असे आवाहन केले. महाविद्यालयाचे निवडणूक साक्षरता मंच नोडल अधिकारी डॉ.फारोकी मोहम्मद खय्यूम यांनी मतदार नोंदणी करताना आवश्यक कागदपत्रे, ऑनलाइन नोंदणी प्रक्रिया आणि मतदार ओळखपत्राबाबत विद्यार्थ्यांना माहिती दिली.या शिबिरामध्ये पात्र विद्यार्थ्यांना नवीन मतदार म्हणून नाव नोंदणी करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती.दि. ०१ ऑक्टोबर २०२६ रोजी वयाची १८ वर्षे पूर्ण झालेले सर्व विद्यार्थी- विद्यार्थिनी या नोंदणीसाठी पात्र होते.मतदार नोंदणी प्रक्रियेत पात्र विद्यार्थ्यांनी सहभागी होऊन या शिबिराचा लाभ घेतला. हे शिबिर यशस्वी करण्यासाठी बीड तालुका निवडणूक प्रशासक श्री. सुरेंद्र डोके, महाविद्यालयातील निवडणूक साक्षरता मंच नोडल अधिकारी डॉ.फारोकी मोहम्मद खय्यूम,डॉ.शेख गफूर अहमद, प्रोफेसर मिर्झा असद बेग, डॉ. फारूक सौदागर तसेच राष्ट्रीय सेवा योजनाचे कार्यक्रमाधिकारी प्रा. शोएब पिरजादे, डॉ. शामल जाधव यांची उपस्थिती होती.

## महेश वासरे यांना राजर्षी शाहु पुरस्कार जाहीर




**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सुल्लाळी केंद्र घोणसी ता. जळकोट येथे कार्यरत असलेले उपक्रमशील शिक्षक श्री महेश वासरे सरांना राजश्री शाहू प्रतिष्ठानच्या वतीने दिला जाणारा सन २०२६ चा राजर्षी शाहू पुरस्कार जाहीर झाला असून निवडीचे पत्र प्रतिष्ठानचे अध्यक्ष अप्पाराव शिंदे सर यांनी उदगीर नगरीचे माजी नगराध्यक्ष श्री राजेश्वरजी निटुरे सावकार, लातूर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष श्री राहुल भैया केंद्रे साहेब, जिल्हा परिषद सदस्य श्री रामचंद्र तिरुके साहेब, जिल्हा परिषद सदस्य श्री ज्ञानेश्वर बिरादार साहेब, सर्जेराव बिरादार सर ,नंदकुमार काळे सर ,आदर्श शिक्षक श्री हवा सर यांच्या उपस्थितीत देण्यात आले करिता त्यांचा आज दिनांक २८ सप्टेंबर २०२६ रोजी श्री राजू नागरगोजे सर गोपीनाथ केंद्रे सर ,नारायण पाटील सर ,अण्णाराव केंद्रे सर, विरभद्र देशमुख सर आदींनी सत्कार केला हा पुरस्कार वितरण सोहळा दिनांक २ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता थोर मोठे मंगल कार्यालय औसा रोड लातूर येथे आयोजित केला आहे या कार्यक्रमासाठी आपण सर्वांनी उपस्थित राहावे अशी विनंती पुरस्कार प्राप्त शिक्षक श्री महेश वासरे सर यांनी केले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २९ सप्टेंबर २०२६


## बीसीए विभागाच्या सहा दिवसीय रोजगाराभिमुख प्रशिक्षण कार्यशाळेचा उत्साहात समारोप




**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. (सौ.) इंदिराबाई भास्करराव पाठक महिला महाविद्यालयातील डिपार्टमेंट ऑफ मॅनेजमेंट सायन्स—बीसीए विभाग आणि नांदी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थिनींच्या रोजगारक्षमतेत वाढ व्हावी, त्यांच्यात आवश्यक व्यावसायिक कौशल्ये विकसित व्हावीत आणि युवकांना रोजगाराच्या संधींसाठी सक्षम करता यावे, या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या ‘Training Workshop on Employability Enhancement & Youth Livelihood Program’ या सहा दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळेचा उत्साहपूर्ण वातावरणात समारोप झाला. ही कार्यशाळा दिनांक २१ ते २६ सप्टेंबर २०२६ या कालावधीत घेण्यात आली.आजच्या स्पर्धात्मक आणि वेगाने बदलणाऱ्या रोजगारविश्वात केवळ शैक्षणिक ज्ञान पुरेसे नसून विद्यार्थ्यांमध्ये संवादकौशल्य, आत्मविश्वास, संघभावना (Team Work), समस्या निराकरण कौशल्य (Problem Solving), मुलाखत कौशल्य (Interview Skills), वेळेचे व्यवस्थापन (Time Management) आणि कार्यस्थळासाठी आवश्यक तयारी (Workplace Readiness) यांसारख्या कौशल्यांचा विकास होणे अत्यंत आवश्यक आहे. या दृष्टिकोनातून आयोजित करण्यात आलेल्या प्रशिक्षण कार्यशाळेमुळे विद्यार्थिनींना व्यावसायिक जगाच्या अपेक्षा समजून घेण्याबरोबरच स्वतःमधील विविध कौशल्ये ओळखून ती विकसित करण्याची महत्त्वपूर्ण संधी मिळाली.या प्रशिक्षण कार्यशाळेचे उद्घाटन २१ सप्टेंबर २०२६ रोजी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. अन्विता अग्रवाल यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यशाळेदरम्यान नांदी फाउंडेशनच्या अश्विनी टिळक यांनी विद्यार्थिनींना व्यावसायिक क्षेत्रातील विविध संधी, उद्योगविश्वाच्या अपेक्षा, रोजगारासाठी आवश्यक कौशल्ये तसेच प्रत्यक्ष कार्यक्षेत्रातील अनुभव याबाबत मार्गदर्शन केले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थिनींना शैक्षणिक ज्ञानासोबतच रोजगारासाठी आवश्यक असलेल्या व्यावहारिक कौशल्यांचे महत्त्व समजले.सहा दिवसांच्या या प्रशिक्षणादरम्यान विविध उपक्रम, संवादात्मक सत्रे आणि कौशल्यविकासाच्या माध्यमातून विद्यार्थिनींना स्वतःचा आत्मविश्वास वाढविणे, प्रभावी संवाद साधणे, समूहामध्ये काम करणे, समस्या सोडविणे तसेच मुलाखतीला सामोरे जाणे यांसारख्या बाबींचा प्रत्यक्ष सराव करून घेण्यात आला. प्रशिक्षणाचा अनुभव विद्यार्थिनींसाठी उपयुक्त आणि प्रेरणादायी ठरला. समारोपाच्या कार्यक्रमात विद्यार्थिनींनी आपल्या मनोगतातून प्रशिक्षणादरम्यान मिळालेल्या अनुभवांची व शिकलेल्या कौशल्यांची माहिती व्यक्त केली.कार्यशाळेच्या समारोपप्रसंगी डॉ. सुनंदा चक्रनारायण यांनी अध्यक्षीय भाषणातून विद्यार्थिनींना बदलत्या रोजगारविश्वाशी जुळवून घेत सातत्याने नवीन कौशल्ये आत्मसात करण्याचे आवाहन केले. शिक्षणासोबत कौशल्यविकास, आत्मविश्वास आणि सकारात्मक दृष्टिकोन यांची सांगड घातल्यास विद्यार्थिनींना आपल्या भविष्यातील करिअरच्या संधी अधिक प्रभावीपणे साधता येतील, असे त्यांनी नमूद केले.हा प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बीसीए विभागप्रमुख प्रा. अंजली उमाळकर तसेच प्रा. तेजा दीक्षित, प्रा. माधुरी मुत्याल आणि प्रा. रितू ठाकूर यांनी विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थिनींच्या सर्वांगीण विकासासोबतच त्यांना रोजगारक्षम आणि आत्मविश्वासपूर्ण बनविण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरला.

## 'संवाद प्रतिभावंताशी' या कार्यक्रमात प्रसिद्ध लेखिका डॉ. प्रतिभाताई अहिरे यांचे व्याख्यान

**छ. संभाजीनगर (प्रतिनिधी) :** महात्मा फुले यांच्या द्विशताब्दी वर्षानिमित्त...डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य परिषद व मराठी विभाग, डॉ बाबासाहेब आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालय, नागसेनवन, छ. संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने.'संवाद प्रतिभावंताशी 'हा सृजनशील उपक्रम आयोजित केला आहे यामध्ये विषय : 'महात्मा फुले यांचे विचार आणि आजचे समाज वास्तव 'या विषयावर प्रमुख व्याख्यान डॉ. प्रतिभाताई अहिरे( प्रसिद्ध लेखिका )यांचे राहील तर कार्यक्रमाच्या अध्यक्ष डॉ. प्रज्ञाताई साळवे (जेष्ठ सामाजिक कार्यकर्त्या ) या राहणार आहेत तर प्रस्तावना : प्रा.नागनाथ करडे व प्रमुख उपस्थिती मध्ये डॉ नवनाथ गोरे (प्राचार्य. डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालय, नागसेनवन ), डॉ. मोहन सौंदर्य (अध्यक्ष :डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य परिषद ), डॉ. युवराज धबडगे (सचिव : डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य परिषद ) डॉ. शिवाजी डोळसे,( जिल्हा शाखा अध्यक्ष :डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य परिषद ) हे असतील या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन :प्रा. पंकज शिंदे तर आभार डॉ. मिलिंद वाव्हळे करतील. हा कार्यक्रम बुधवार दि. 30 सप्टेंबर 2026 रोजीडॉ. बाबासाहेब आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालय, नागसेनवन, छ. संभाजीनगर येथे संध्याकाळी 5:00 वाजता आयोजित केला आहे.या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन डॉ बाळासाहेब लिहिणार, डॉ. ज्ञानेश्वर कांबळे, डॉ. बाळासाहेब गायकवाड, डॉ. विठ्ठल जाधव, प्रा.राजरत्न दवणे, प्रा. भाग्योदय घाटे., डॉ. सुधाकर नवसागर, डॉ.ह. नि. सोनकांबळे,डॉ. रेखा वाघ, , डॉ. प्रमोद पठारे, डॉ. योगिता देवगिरीकर, डॉ. शिल्पा काकडे, प्रा. जितेंद्र शेजवळ,प्रा. मिलिंद ठोकळे, डॉ. मधुकर वाकळे डॉ.गौतम होनवडजकर, प्रा. पंकज शिंदे, प्रा. अनिल दंडाळे, प्रा. केशरचंद राठोड, प्रा. विनोद सुर्वे यांनी केले

## राजीव गांधी महाविद्यालयात माहिती अधिकार दिन उत्साहात साजरा



**करमाड :** राजीव गांधी कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, करमाड ता.जि.छत्रपती संभाजीनगर येथील राज्यशास्त्र विभागाच्या वतीने दि. २८ सप्टेंबर २०२६ रोजी “माहिती अधिकार दिन” कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. एस. मुळे होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा. डॉ. जयश्री पाटील तर प्रमुख उपस्थिती म्हणून उपप्राचार्य प्रा. मनोज देवकर उपस्थित होते.कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.प्रास्ताविकातून प्रा. डॉ. रमेश कचरे यांनी माहिती अधिकार दिनाचे महत्त्व स्पष्ट केले. त्यानंतर प्रा. डॉ. जयश्री पाटील यांनी “माहिती अधिकार” या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. माहिती अधिकारामुळे प्रशासनात पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढण्यास मदत होते. नागरिकांनी आपल्या अधिकारांची जाणीव ठेवून त्याचा जबाबदारीने वापर करावा, असे त्यांनी सांगितले.अध्यक्षीय समारोपात प्राचार्य प्रो. डॉ. एस. एस. मुळे यांनी माहिती अधिकार हा लोकशाही व्यवस्थेतील महत्त्वाचा घटक असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांनी संविधानिक मूल्ये आणि नागरिकांच्या अधिकारांचा अभ्यास करून जागरूक नागरिक बनावे, असे आवाहन त्यांनी केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ. किशोर काळे यांनी केले, तर प्रा. प्रशांत माठे यांनी आभार मानले. कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २९ सप्टेंबर २०२६

# हृदय जपले तरच जीवनाची लय टिकेल - डॉ. राजेंद्र बगाटे

मानवी शरीरातील हृदय हा आकाराने लहान, पण कार्याने अत्यंत महत्त्वाचा अवयव आहे. जन्मापासून आयुष्याच्या अखेरच्या क्षणापर्यंत अविरत कार्यरत राहून ते शरीराच्या प्रत्येक भागाला रक्त, प्राणवायू आणि पोषक घटक पोहोचवते. म्हणून हृदयाचे आरोग्य म्हणजे केवळ एका अवयवाचे आरोग्य नसून संपूर्ण जीवनाचा आधार आहे. मात्र बदलती जीवनशैली, असंतुलित आहार, शारीरिक हालचालींचा अभाव, तंबाखू व धूम्रपान, मानसिक ताण, अपुरी झोप, वाढते वजन, उच्च रक्तदाब, मधुमेह आणि रक्तातील वाढलेले कोलेस्टेरॉल यांमुळे हृदयाच्या आरोग्यासमोर गंभीर आव्हाने निर्माण झाली आहेत. त्यामुळे २९ सप्टेंबरचा 'जागतिक हृदय दिन' हा केवळ जनजागृतीचा दिवस न राहता आपल्या जीवनपद्धतीचा पुनर्विचार करण्याची संधी ठरली पाहिजे.जगभरातील मृत्यूंच्या प्रमुख कारणांमध्ये हृदय व रक्तवाहिन्यांशी संबंधित आजारांचा समावेश होतो. जागतिक आरोग्य संघटनेनुसार, २०२२ मध्ये या आजारांमुळे सुमारे १.९८ कोटी लोकांचा मृत्यू झाला. त्यामध्ये हृदयविकाराचा झटका आणि पक्षाघाताचा मोठा वाटा आहे. या आकडेवारीकडे केवळ वैद्यकीय समस्या म्हणून पाहणे अपुरे ठरेल. हृदयविकाराचा संबंध व्यक्तीच्या आहाराशी, कामाच्या स्वरूपाशी, व्यायामाच्या सवयीशी, मानसिक स्थितीशी, पर्यावरणाशी आणि आरोग्यसेवेच्या उपलब्धतेशी आहे. त्यामुळे उपचारांइतकेच प्रतिबंध आणि आरोग्यविषयक जागरूकता महत्त्वाची आहे.हृदयविकार केवळ वृद्धांचा आजार आहे, ही धारणा बदलण्याची गरज आहे. बैठी जीवनशैली, सततचा मानसिक ताण, अनियमित झोप, रात्रीचे जागरण, प्रक्रिया केलेले खाद्यपदार्थ आणि डिजिटल साधनांचा अतिरेक यामुळे तरुण वयातही हृदयाच्या आरोग्याशी संबंधित जोखीम वाढू शकते. पूर्वी दैनंदिन जीवनातील अनेक कामांतून सहज शारीरिक श्रम होत असत; आज वाहनांचा आणि यंत्रांचा वाढता वापर, कार्यालयीन बैठी कामे आणि पडद्यांसमोरील वाढता वेळ यामुळे शरीराची हालचाल कमी झाली आहे. त्यामुळे हृदयाची काळजी वृद्धापकाळात सुरू करण्याऐवजी बालपणापासूनच निरोगी सवयी रुजविणे आवश्यक आहे. हृदयाच्या आरोग्याचा आहाराशी थेट संबंध आहे. पारंपरिक आहारातील धान्ये, डाळी, कडधान्ये, भाज्या, पालेभाज्या आणि फळे यांचे स्थान आता अनेकदा अतिप्रक्रिया केलेले पदार्थ, तळलेले खाद्यपदार्थ, अधिक मीठ-साखर असलेले पदार्थ आणि गोड पेये घेत आहेत. चव आणि सोयीच्या मागे धावताना पोषणमूल्याचा विचार मागे पडतो. हृदयासाठी कोणताही एक चमत्कारिक आहार नसतो; ताजे, संतुलित आणि विविधतापूर्ण अन्न, योग्य प्रमाण आणि मीठ-साखरेचे भान ही अधिक महत्त्वाची तत्त्वे आहेत. त्याचबरोबर शरीराला नियमित हालचाल मिळणे आवश्यक आहे. चालणे, सायकल चालवणे, पोहणे, योगासने, मैदानी खेळ किंवा आपल्या क्षमतेनुसार केलेली नियमित शारीरिक हालचाल आरोग्यदायी जीवनशैलीचा भाग होऊ शकते. आधीपासून हृदयविकार किंवा इतर गंभीर आजार असल्यास व्यायामाबाबत वैद्यकीय सल्ला घेणे आवश्यक आहे.तंबाखू आणि धूम्रपान हृदयासाठी घातक आहेत. सिगारेट, विडी, गुटखा, मावा किंवा तंबाखूच्या इतर प्रकारांचे सेवन रक्तवाहिन्यांवर विपरीत परिणाम करू शकते आणि हृदयविकारासह अनेक आजारांचा धोका वाढवते. व्यसनापासून मुक्त होणे काहींसाठी कठीण असले तरी त्यासाठी समुपदेशन आणि वैद्यकीय मदत उपलब्ध आहे. विशेषतः युवकांमध्ये तंबाखूची सुरुवातच होऊ नये यासाठी कुटुंब, शाळा, महाविद्यालये आणि समाजाने एकत्रित प्रयत्न करणे गरजेचे आहे. तंबाखूमुक्त जीवन हा केवळ वैयक्तिक आरोग्याचा प्रश्न नसून कुटुंबाच्या आरोग्याशी जोडलेली जबाबदारी आहे.आधुनिक जीवनातील सततचा ताण हृदयाच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करण्यास कारणीभूत ठरतो. रोजगारातील स्पर्धा, आर्थिक चिंता, कौटुंबिक जबाबदाऱ्या, सामाजिक अपेक्षा आणि सततची डिजिटल उपलब्धता यामुळे मनाला विश्रांती मिळणे कठीण झाले आहे. ताण कमी करण्यासाठी धूम्रपान, मद्यपान किंवा अस्वास्थ्यकर अन्नाचा आधार घेणे समस्या वाढवू शकते. त्याऐवजी पुरेशी झोप, नियमित शारीरिक हालचाल, कुटुंबीयांशी संवाद, छंद, ध्यान-योग आणि आवश्यकतेनुसार समुपदेशन यांसारख्या आरोग्यदायी मार्गांचा अवलंब करणे अधिक योग्य आहे. शरीर आणि मन यांचे आरोग्य परस्परांपासून वेगळे करता येत नाही.उच्च रक्तदाब, मधुमेह आणि रक्तातील वाढलेले कोलेस्टेरॉल हे हृदयविकाराच्या जोखमीतील महत्त्वाचे घटक आहेत. यांपैकी काही स्थिती सुरुवातीला स्पष्ट लक्षणे न देता वाढू शकतात. त्यामुळे 'काही त्रास नाही म्हणजे आजार नाही' हा समज टाळणे आवश्यक आहे. नियमित रक्तदाब तपासणी, रक्तातील साखर व कोलेस्टेरॉलची तपासणी, वजनावर नियंत्रण आणि वैद्यकीय सल्ल्यानुसार आवश्यक आरोग्य तपासण्या करून घेणे ही प्रतिबंधात्मक आरोग्यसेवेची महत्त्वाची पायरी आहे. कुटुंबात हृदयविकाराचा इतिहास असल्यास किंवा मधुमेह व उच्च रक्तदाबासारख्या समस्या असल्यास अधिक सजग राहणे गरजेचे आहे.हृदयविकाराची लक्षणे ओळखणे आणि तातडीने उपचार मिळवणेही तितकेच महत्त्वाचे आहे. छातीत दडपण किंवा वेदना, श्वास घेण्यास त्रास, अचानक घाम येणे, मळमळ, चक्कर, असामान्य अशक्तपणा किंवा वेदना हात, खांदा, पाठ, मान अथवा जबड्याकडे जाणे यांसारखी लक्षणे दिसू शकतात. प्रत्येक व्यक्तीत लक्षणे सारखी असतीलच असे नाही. अचानक गंभीर लक्षणे जाणवल्यास घरगुती उपायांवर वेळ न घालवता तातडीने वैद्यकीय मदत घेणे आवश्यक आहे. हृदयविकाराच्या उपचारात वेळ हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे.महिलांच्या हृदयाच्या आरोग्याकडे विशेष लक्ष देण्याची गरज आहे. घर, रोजगार, मुलांचे संगोपन, वृद्धांची काळजी आणि इतर जबाबदाऱ्यांमध्ये स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष होऊ शकते. त्यामुळे महिलांनी नियमित आरोग्य तपासणीला प्राधान्य देणे आणि कुटुंबीयांनीही त्यासाठी आवश्यक सहकार्य करणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे ग्रामीण भागातील नागरिकांसाठी प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि स्थानिक आरोग्यव्यवस्थेत रक्तदाब, मधुमेह आणि हृदयविकाराच्या जोखमीची प्राथमिक तपासणी सहज उपलब्ध असणे आवश्यक आहे. तज्ज्ञ सेवा आणि आपत्कालीन उपचारांपर्यंत पोहोचण्यातील अडचणी कमी करणे हे सार्वजनिक आरोग्यव्यवस्थेचे महत्त्वाचे उद्दिष्ट असले पाहिजे.हृदयाच्या आरोग्याचा संबंध पर्यावरणाशीही आहे. वायुप्रदूषण, ध्वनीप्रदूषण, वाहतुकीची गर्दी आणि हिरवळीचा अभाव यांचा मानवी आरोग्यावर परिणाम होतो. त्यामुळे आरोग्यदायी शहर म्हणजे केवळ मोठी रुग्णालये असलेले शहर नव्हे; तर नागरिकांना चालता येईल, सायकल चालवता येईल, व्यायाम करता येईल आणि स्वच्छ हवा मिळेल असे शहर होय. उद्याने, सार्वजनिक मैदाने, सुरक्षित पदपथ आणि सायकल मार्ग यांसारख्या सुविधा आरोग्यदायी जीवनशैलीला प्रोत्साहन देतात. पर्यावरण संरक्षण आणि सार्वजनिक आरोग्य यांचा परस्परसंबंध समजून घेणे त्यामुळे आवश्यक आहे.मुलांच्या जीवनशैलीकडेही गांभीर्याने पाहिले पाहिजे. बालपणात लागलेल्या सवयी पुढील आयुष्यात टिकतात. त्यामुळे मुलांना संतुलित आहार, मैदानी खेळ, नियमित शारीरिक हालचाल आणि पुरेशी झोप यांची सवय लावणे आवश्यक आहे. प्रत्येक मोकळ्या वेळेत भ्रमणध्वनी किंवा दूरचित्रवाणीचा वापर करण्याऐवजी खेळ, वाचन आणि सामाजिक उपक्रमांना स्थान मिळाले पाहिजे. शाळांमध्येही आरोग्यशिक्षण केवळ पाठ्यपुस्तकातील विषय न राहता प्रत्यक्ष जीवनशैलीशी जोडले गेले पाहिजे. आजच्या मुलांच्या आरोग्यदायी सवयी म्हणजे उद्याच्या निरोगी समाजाची पायाभरणी होय.आरोग्यविषयक माहितीच्या वाढत्या प्रसाराबरोबर चुकीच्या माहितीचे आव्हानही वाढले आहे. सामाजिक माध्यमांवर हृदयविकारासाठी विविध घरगुती उपाय, चमत्कारिक उपचार किंवा तपासणीशिवाय औषधोपचार सुचविले जातात. अशा माहितीवर अंधविश्वास ठेवण्याऐवजी तिचा स्रोत आणि वैज्ञानिक आधार तपासणे आवश्यक आहे. हृदयाशी संबंधित समस्या असल्यास पात्र वैद्यकीय तज्ज्ञांचा सल्ला घेणे अधिक सुरक्षित आहे. स्वतःहून औषधोपचार करण्यापेक्षा योग्य वेळी योग्य निदान आणि उपचार घेणे महत्त्वाचे आहे.हृदयाचे आरोग्य ही केवळ व्यक्तीची जबाबदारी नाही. कुटुंब, शाळा, कार्यस्थळे, स्थानिक स्वराज्य संस्था, आरोग्य यंत्रणा आणि शासन या सर्वांची त्यात भूमिका आहे. आरोग्यदायी आहाराची उपलब्धता, तंबाखूमुक्त सार्वजनिक वातावरण, शारीरिक हालचालींसाठी सुरक्षित जागा, आरोग्य तपासणीच्या सुविधा आणि वेळेवर वैद्यकीय सेवा यांचा विस्तार झाला तर हृदयविकाराचा धोका कमी करण्यासाठी पोषक सामाजिक वातावरण तयार होऊ शकते. 'आजार झाल्यावर उपचार' या दृष्टिकोनाबरोबर 'आजार होऊ नये म्हणून प्रतिबंध' ही आरोग्यव्यवस्थेची दिशा अधिक मजबूत होणे गरजेचे आहे.जागतिक हृदय दिनाचा खरा अर्थ एका दिवसापुरता कार्यक्रम आयोजित करण्यात नाही, तर आपल्या दैनंदिन निवडींमध्ये आरोग्याला स्थान देण्यात आहे. काय खातो, किती हालचाल करतो, किती झोपतो, ताणाचा सामना कसा करतो, तंबाखूपासून दूर राहतो का आणि आरोग्याच्या इशाऱ्यांकडे किती गांभीर्याने पाहतो, यावर आपल्या हृदयाचे भवितव्य मोठ्या प्रमाणात अवलंबून असते. आरोग्यासाठी वेळ 'उरला' तर देण्याऐवजी आरोग्यासाठी वेळ राखून ठेवण्याची सवय लागली पाहिजे.२९ सप्टेंबरचा जागतिक हृदय दिन त्यामुळे भीती निर्माण करण्याचा नव्हे, तर सजगता वाढविण्याचा दिवस आहे. हृदय आपल्यासाठी आयुष्यभर अविरत कार्य करते; त्याच्या बदल्यात त्याला गरज आहे ती निरोगी जीवनशैलीची आणि वेळेवर घेतलेल्या काळजीची. संतुलित आहार, नियमित हालचाल, व्यसनमुक्त जीवन, पुरेशी झोप, ताणाचे योग्य व्यवस्थापन, नियमित आरोग्य तपासणी आणि लक्षणांकडे वेळीच लक्ष देणे या सवयी स्वीकारल्या तर हृदयाच्या आरोग्यासाठी आपण महत्त्वाचे पाऊल उचलू शकतो. म्हणून या जागतिक हृदय दिनी केवळ हृदयविकाराविषयी चर्चा न करता आपल्या जीवनपद्धतीत आवश्यक बदल करण्याचा संकल्प करूया. हृदय निरोगी असेल तर जीवनाची लय अधिक सक्षम राहील; आणि निरोगी व्यक्तींच्या सहभागातूनच निरोगी कुटुंब, निरोगी समाज आणि सक्षम राष्ट्र घडेल.




**डॉ. राजेंद्र बगाटे, (लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**

**bagate.rajendra5@gmail.com**

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २९ सप्टेंबर २०२६

# घोटणचे मल्लिकार्जुन मंदिर : यादवकालीन स्थापत्याचा उत्कृष्ट नमुना



घोटण या गावातील मल्लिकार्जुन मंदिराला भेट द्यावी, ही इच्छा अनेक वर्षांपासून मनात होती. कारण या गावाशी आमच्या गावचे अत्यंत घनिष्ट नातेसंबंध आहेत. आमच्या नातेवाईकांची घरे तिथे असल्याने घोटण हे नाव लहानपणापासून कानावर होते. पाथर्डीला जाताना नगर-पैठण या राज्यमार्गावरील घोटणमधून अनेकदा जाणे-येणे झाले. भरधाव गाडीतून जातानाही रस्त्याच्या कडेला असलेल्या तटबंदीचे आणि उंच दीपमाळांचे दर्शन व्हायचे, मनात यायचे की थांबावे, पण कधी घाई, तर कधी सोबत असलेल्या लोकांच्या वेळेअभावी मंदिरात थांबून मनसोक्त दर्शन घेण्याचा योग काही जुळून येत नव्हता. या मंदिराविषयी परिसरातील अनेक जाणकारांकडून ऐकले होते, काही वर्तमानपत्रातील लेख वाचलेही होते. अखेर मागील वर्षी तो योग जुळून आला. निवांत वेळ काढून मी मंदिराच्या प्राकारात प्रवेश केला आणि प्रत्यक्ष मंदिर पाहून खरोखरच डोळ्यांचे पारणे फिटले. हा केवळ देवदर्शनाचा अनुभव नव्हता, तर दगडात गोठलेल्या आठशे वर्षांच्या इतिहासाला प्रत्यक्ष स्पर्श करण्याचा अनुभव होता.ऐतिहासिक आणि भौगोलिक पार्श्वभूमीअहिल्यानगर जिल्ह्याचा इतिहास केवळ अहमदनगरच्या निजामशाहीपुरता मर्यादित नाही. या जिल्ह्याचा पूर्व भाग, विशेषतः शेवगाव तालुका हा सातवाहनांची राजधानी असलेल्या प्रतिष्ठान म्हणजेच आजच्या पैठणला खेटून वसलेला आहे. त्यामुळे पैठण-नेवासा-शेवगाव या त्रिकोणात सातवाहन काळापासूनचे अनेक अवशेष आजही शेतात, टेकड्यांवर विखुरलेले सापडतात. पुढे इसवी सनाच्या १० ते १४ व्या शतकात देवगिरीच्या यादवांनी या संपूर्ण महाराष्ट्रावर वैभवशाली राज्य केले. त्यांच्या काळात कला आणि स्थापत्याला मोठे प्रोत्साहन मिळाले. यादवांच्या प्रधानाने, हेमाद्री पंडिताने एक विशिष्ट स्थापत्य शैली रूढ केली, जिला आज आपण हेमाडपंती शैली म्हणतो. या शैलीची वैशिष्ट्ये म्हणजे चुना न वापरता केवळ घडीव दगड एकमेकांत अडकवून केलेली अतिशय मजबूत बांधणी, नक्षत्राकार किंवा ताराकृती तळरचना आणि बाह्य भागावर अत्यंत बारीक आणि जिवंत शिल्पकला. शेवगावपासून अवघ्या १० किमी अंतरावर असलेले घोटणचे मल्लिकार्जुन मंदिर हे त्याच यादवकालीन वैभवाची साक्ष देणारे एक उत्कृष्ट उदाहरण आहे. पुरातत्व विभागाने याला महाराष्ट्रातील संरक्षित स्मारक म्हणून घोषित केले असून त्याचा निर्मितीकाळ सुमारे १२ व्या ते १३ व्या शतकाच्या दरम्यान मानला जातो.नामोत्पत्ती आणि लोक आख्यायिकाघोटण या नावाची उत्पत्ती सांगताना येथे दोन स्तरावर विचार करावा लागतो. पहिला स्तर लोकश्रुतीचा आहे. ही कथा थेट महाभारताशी जोडली जाते. सांगितले जाते की, कौरव आणि जरासंधाने विराट राजाच्या गायी पळवून नेल्या. त्या भयभीत गायी दंडकारण्यातून पळत असताना मल्लिक नावाच्या एका ऋषींनी त्यांना या ठिकाणी आश्रय दिला. गायींचे ठाण म्हणून या जागेला गो-ठाण म्हटले जाऊ लागले आणि त्याचाच अपभ्रंश होऊन पुढे घोटण हे नाव रूढ झाले. त्या मल्लिक ऋषींच्या आज्ञेवरूनच अर्जुनाने येथे भगवान शंकराची कठोर तपश्चर्या केली, म्हणून येथील देवाला मल्लिक + अर्जुन = मल्लिकार्जुन असे नाव पडले, अशी आख्यायिका सांगितली जाते.दुसरा स्तर अधिक तर्कसंगत आणि भौगोलिक आहे. गो-ठाण म्हणजे गोधनाचे मोठे केंद्र किंवा बाजार. गोदावरीच्या खोऱ्यातील हा भाग अत्यंत सुपीक असून प्राचीन काळापासून गुरेढोरे पालनाचा व्यवसाय येथे मोठ्या प्रमाणावर होत होता. त्यामुळे येथे मोठा गोठा किंवा गायींचा बाजार असणे स्वाभाविक आहे. या दोन्ही कथांमधून घोटणचा कृषी संस्कृतीशी असलेला प्राचीन संबंध स्पष्ट होतो.स्थापत्याची वैशिष्ट्ये - घोटणचे मंदिर हे स्थापत्यशास्त्राचा एक उत्तम अभ्यास आहे. चारही बाजूंनी मजबूत दगडी तटबंदी असलेले हे मंदिर पश्चिमाभिमुख आहे, जे शिवमंदिरात अत्यंत दुर्मिळ मानले जाते. बहुतेक शिवमंदिरे पूर्वाभिमुख असतात. पश्चिमाभिमुख असण्यामागे काही विशिष्ट तांत्रिक किंवा भौगोलिक कारण असावे, यावर अभ्यास होणे गरजेचे आहे. मुख्य मंदिर सुमारे ६० फूट लांब-रुंद असून प्राकारात प्रवेश करताच विटांनी बांधलेल्या तीन अतिशय सुबक आणि उंच दीपमाळा नजरेस पडतात. या दीपमाळा नंतरच्या काळात बांधल्या गेल्या असाव्यात.मंदिराची मूळ रचना त्रिअंगी आहे - सभामंडप, अंतराळ आणि गर्भगृह. मंदिराचा जो मूळ तळभाग आहे तो घडीव काळ्या बेसॉल्ट पाषाणात आहे, तर वरील शिखर हे विटा आणि चुन्यात बांधलेले आहे. यावरून हे स्पष्ट होते की काळाच्या ओघात मूळ शिखर नष्ट झाल्यानंतर पेशवेकाळात त्याचा मोठ्या प्रमाणावर जीर्णोद्धार झाला आहे. पेशव्यांनी अनेक जुन्या मंदिरांचा अशाच प्रकारे जीर्णोद्धार केल्याचे आपण पाहतो.सभामंडपात एकूण १६ खांब असून प्रत्येक खांब हा स्थापत्याचा स्वतंत्र नमुना आहे. खांबाचा तळ चौरस, मधला भाग अष्टकोनी आणि वरचा भाग पुन्हा चौरस असा आहे. प्रत्येक खांबावर युद्धाचे प्रसंग, घोड्यावर बसलेले योद्धे, हत्तींचे द्वंद्व, मकरमुख, घटपल्लव आणि काही ठिकाणी मिथुन शिल्पे अशा अत्यंत सूक्ष्म कोरीव कामाने नटलेला आहे. ही शिल्पे तत्कालीन सामाजिक जीवन, युद्धकला आणि उत्सवप्रियतेचे दर्शन घडवतात. खांब आणि तुळई जिथे एकमेकांना मिळतात, तिथे वजन पेलण्यासाठी जे ब्रॅकेट किंवा टेकू बसवलेले असतात, त्यावर यक्ष-यक्षिणींच्या अत्यंत सुबक मूर्ती कोरलेल्या आहेत. सामान्यतः एका ब्रॅकेटवर एक किंवा दोन यक्ष असतात, पण घोटणच्या मंदिराचे वेगळेपण म्हणजे मधल्या चार मुख्य खांबांवर एकाच ठिकाणी पाच यक्षांची गुंफण आहे - एका बाजूला तीन आणि उरलेल्या दोन बाजूंना प्रत्येकी एक. हे येथील शिल्पकाराच्या असामान्य कल्पकतेचे आणि प्रयोगशीलतेचे प्रतीक आहे.सभामंडपातच इतिहासाच्या दृष्टीने महत्त्वाचे असे काही पुरावे ठेवलेले आहेत. यात अनेक वीरगळ, सतीशिळा, भग्न मूर्ती आणि एक अत्यंत दुर्मिळ अशी गद्धेगळ आढळते. गद्धेगळ म्हणजे गाढवाच्या शापाचा शिलालेख. एखाद्या दानपत्राचा किंवा कराराचा भंग केल्यास गाढवाचा शाप लागेल, असा इशारा देणारा हा शिलालेख मध्ययुगीन सामाजिक न्यायव्यवस्थेवर प्रकाश टाकतो.गर्भगृहाचे गूढ - पाताळलिंगाची संकल्पनाया मंदिराचे सर्वात मोठे आश्चर्य आणि स्थापत्यनवल म्हणजे त्याचा गर्भगृह. सामान्य शिवमंदिराचा गाभारा हा ३ ते ४ फूट खोल असतो. येथे मात्र गर्भगृह तब्बल १५ फूट खोल असून तो दोन टप्प्यांत विभागलेला आहे. पाच दगडी पायऱ्या उतरून आपण पहिल्या चौथऱ्यावर येतो. तेथे दोन्ही बाजूला सपाट जागा असून एका बाजूला एक छोटा दरवाजा आणि दुसऱ्या बाजूला एक जाळीदार झरोका आहे. या चौथऱ्यावरही चार अलंकृत खांब असून त्यावर विविध शिल्पे कोरलेली आहेत. या पायऱ्यांवरही काही भक्तांच्या प्रतिमा कोरलेल्या दिसतात. तेथून आणखी दहा पायऱ्या उतरून खाली गेल्यावरच मुख्य शिवलिंगाचे दर्शन होते.या शिवलिंगाला पाताळलिंग असे म्हणतात. कारण पिंडीच्या अगदी शेजारी एक नैसर्गिक पाण्याचा झरा असून बाराही महिने पाणी असते, त्यामुळे पिंड कायम पाण्यात बुडालेली असते. अशीच पाताळलिंगाची रचना अंबरनाथ आणि त्र्यंबकेश्वर येथेही पाहायला मिळते. खोल गाभाऱ्यात उतरताना भक्ताने प्रतीकात्मकरीत्या पाताळात जाऊन शिवतत्वाचा शोध घ्यावा आणि अहंकार सोडून नम्र व्हावे, ही त्यामागील तात्विक आणि आध्यात्मिक संकल्पना असावी.गर्भगृहाच्या द्वारशाखा तर अत्यंत देखण्या आहेत. प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूच्या तळाशी पाठीवर मुंगुसाची पिशवी घेतलेल्या कुबेराच्या सुरेख मूर्ती आहेत, जो धन आणि समृद्धीचे प्रतीक आहे. पण सर्वात दुर्मिळ आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे ललाटबिंबावर असलेले शिल्प. सहसा ललाटबिंबावर गणपती किंवा गजलक्ष्मी असते, पण येथे हातात धनुष्य घेतलेल्या शिवाची म्हणजेच त्रिपुरारी शिवाची मूर्ती आहे. हे अत्यंत दुर्मिळ शिल्प आहे.परिसरमल्लिकार्जुन मंदिर एकटे नाही. त्याच्या समोरच बळेश्वर नावाचे छोटे मंदिर आहे. काही पायऱ्या चढून गेल्यावर थोड्या अंतरावरच जटाशंकर महादेवाचे पुरातन मंदिर लागते. याच आवारात एक जैन मंदिर म्हणून अधिसूचित असलेले मंदिरही आहे, ज्यात सध्या शिवलिंग ठेवलेले आहे. यावरून हा परिसर शैव आणि जैन या दोन्ही धर्मांचा संगम होता, हे सिद्ध होते. आजही महाशिवरात्रीला येथे मोठी यात्रा भरते आणि देवाचे पूजापाठ करण्याचा वंशपरंपरागत मान अनेक पिढ्यांपासून शिंदे घराण्याकडे आहे. त्यांच्याकडे पेशवेकालीन सनदाही पाहायला मिळतात.थोडक्यात, रम्य परिसर, शिल्पांनी नटलेले आणि काहीसे वेगळे स्थापत्य आणि त्यामागील दंतकथा यामुळे घोटणचे मल्लिकार्जुन मंदिर हे केवळ धार्मिक स्थळ न राहता एक अभ्यासपूर्ण ऐतिहासिक ठेवा ठरते. पैठणसारख्या महानगराच्या छायेत असूनही आपले स्वतंत्र अस्तित्व टिकवून ठेवणारे हे यादवकालीन वैभव प्रत्येक इतिहासप्रेमीने आणि भटक्याने मुद्दाम वाट वाकडी करून एकदा तरी पाहावेच असे आहे.

**डॉ. शिवाजी हुसे 'एका भटक्याची शोधयात्रा' या सदरातील लेख**